विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| कार्यकारी संपादक | : | श्री. मोहन पाठक |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००२ |
| वर्ष | : | दुसरे |
| अंक | : | ५ |
| पृष्ठे | : | ३६ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**


**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ५६**

MAHMAR 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ

व्ही. पी. एम्.



# दिशा

वर्ष दुसरे / अंक ५ / एप्रिल २००२

## संपादकीय


## पुरस्कृत केलेल्या पुरस्कारांचा वर्षाव

चित्रपट माध्यमाचं किती प्रचंड आकर्षण आम्हाला आहे याचा प्रत्यय 'लगान' च्या निमित्ताने पुन्हा एकदा आला. जगभर हे आकर्षण असणारे लोक आहेतच पण व्यक्ती पूजेचा सोस असणाऱ्या आपल्या भारतीय मनाला हे आकर्षण विशेष आहे. पंचवीस मार्च ची सकाळ तारवटलेल्या डोळ्यांनी टी. व्ही. कडे पाहणाऱ्या बहुतेकांनी हे अनुभवलं. त्या टी. व्ही. वर चालू असणारं सारे काही पाहण्यात रस नसलेल्या, इंग्रजी न कळणाऱ्या माणसांनीही कंटाळत पण 'लगान' 'लगान' करीत चार साडे चार तास टी. व्ही. पाहिला.

वास्तविक जे चित्रपट चर्चेत होते व चर्चेत असण्याची त्यांची जी कारणं होती ती नीट आभ्यासलेल्यांना भाकित माहीत होतं. पण हवा अशी काही निर्माण करण्यात आली होती की " अपनी जीत हो.... उनकी हार हां... ! आपल्या देशाचा चित्रपट म्हणून वाटणारी आशा कदाचित पटेलही कारण मॅच फिक्सिंगच्या पूर्वीच्या काळात क्रिकेटचे अटीतटीचे सामने देशप्रेमाचे प्रातिनिधिक उदाहरण वाटत. ८३ च्या वर्ल्डकप मध्ये आपण जिंकलो तो ऐतिहासिक क्षण आनंदाचा होताच. पण त्याच सामन्यात वेस्ट इंडिजचा कर्णधार पीच वर पालथा पडून ढसाढसा रडला हे दृश्य मला आश्चर्य बोलकं वाटलं. या पार्श्वभूमीवर लगान बद्दल च्या आशेचा अन्वयार्थ लागू शकेलही.

'लगान' ने निराशा केली त्या मागे अनेक कारणे आहेत. या कारणांवर असलेल्या लेखांनी अनेक वर्तमान पत्रांचे रकाने उतू गेले आणि जात आहेत. पण भारतात तयार होणाऱ्या शेकडा नव्वदांहून अधिक चित्रपटांचा विचार केला तर गुन्हेगारीचे विकृत उदात्तीकरण, प्रेमाचे झिजलेले बोथट त्रिकोण, अंगविक्षेपांमुळे फार्स कडे झुकणारा अभिनय ही आणि अशीच ढोबळ वैशिष्ट्ये ही चित्रपट सृष्टीची ओळख आहे. 'पीपल गेट द गव्हर्नमेंट', 'दे डिझर्व्ह' असं म्हणतात.

(पान क्र. १५वर)



व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष दुसरे / अंक ५ / एप्रिल २००२

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : ५४२ ६२ ७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिन्टस,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : ५३४ १२ ९१
५४१ ३५ ४६

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्रीसंत तुकाराम महाराज : एक हितगुज | वासुदेव देशपांडे | ३ |
| २) | "एक सुखद अनुभव" | श्रीमती वेदवती हब्बु | ५ |
| ३) | बुध्दाच्या छायेत | सृष्टी अंकोलकर | ७ |
| ४) | नागरिकशास्त्र - स्वरुप | ज्योती चव्हाण | ९ |
| ५) | सांस्कृतिक जीवन-उत्तुंग व्यक्तिमत्वे | श्री. शं. बा. मठ | १६ |
| ६) | भारतातील लोकसंख्या वाढ - एक समस्या | श्री. प्रभाकर अरदकर | २३ |
| ७) | गुण सम्राज्ञी | वर्षा गटणे | २५ |
| ८) | गीतेतील अध्याय १ ला ॥ अर्जुनविषादयोगः ॥ | आशा भिडे | २७ |
| ९) | पर्यटन विषयक विशेष माहिती देणाऱ्या सरकारच्या अधिकृत साइट्स | | ३२ |
| १०) | परिसर वार्ता | प्रा. मोहन पाठक | ३३ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# श्रीसंत तुकाराम महाराज : एक हितगुज

*वासुदेव देशपांडे हे दिशाचे जुने वाचक व हितचिंतक. देहूला गेल्यावर त्यांना जे जाणवले ते त्यांनी शब्दबद्ध केले. गेल्याच महिन्यात तुकाराम बीज झाली. त्या निमित्ताने या लेखनातील विचार महत्वाचे आहेत. - संपादक*

पुण्यापासून वीस मैलांवर देहू हे एक गाव आहे. इंद्रायणी नदीच्या काठी हे गाव वसलेले आहे. देहू हे अत्यंत चिमुकले गाव आहे. या गावात संत तुकाराम महाराजांचा अवतार सोळाव्या शतकात झाला. तुकाराम बोल्होबा आंबिले, हे पेशाने वाणी. त्यांचा जन्म तसा सुखवस्तू समाजात झाला. तुकाराम महाराज हे विशीत असताना त्यांचे थोरले बंधू सावजी हे विरक्ती घेवून घर सोडून गेले. वयाच्या सतराव्या वर्षी तुकाराम महाराजांचे वडिल वारले. त्यांची आई व भावजय हे सुद्धा एकापाठोपाठ एक कालवश झाले.

एकवीस बावीस वर्षाचे असतानाच त्यांना मोठ्या दुष्काळाला तोंड द्यावे लागले. दुष्काळामुळे त्यांचा व्यापार बुडाला. दुष्काळातच त्यांची पत्नी व मुलगा मृत्यु पावले. परिणामी तुकाराम महाराज अत्यंत उदास झाले. संत तुकाराम हे स्वतंत्र प्रज्ञेचे गृहस्थ होते. त्यांनी त्यांच्या कठीण काळात अत्यंत कुशलतेने संसाराचा गाडा हाकला. पण आपण प्रयत्नांची पराकाष्ठा करून सुद्धा आपल्या संसाराची ही दशा का झाली हे त्यांना समजत नव्हते. माणसाची मर्यादा व परमेश्वराची अमर्याद शक्ती या दोन्ही गोष्टी त्यांच्या लक्षात आल्या.

संत ज्ञानेश्वरांनी सांगितले आहे. 'एक तरी ओवी अनुभवावी' येथे जोर ओवीवर नसून अनुभवण्यावर आहे. अनुभव घेणे आवश्यक आहे. तुकाराम महाराजांना आपल्या संसाराच्या शूद्रतेचा अनुभव आला. ते भक्तीमार्गाकडे वळले. 'गोविंद गोविंद । मनी लागला छंद ॥' अशी त्यांची अवस्था झाली. त्यांच्या दुसऱ्या पत्नी जिजाबाई या अत्यंत कर्तबगार होत्या. महाराजांचा जो काही ऐहिक संसार झाला, त्यांच्या कुटुंबाला जे काही पोटात ढकलायला मिळाले ते जिजाबाईमुळेच. त्यांना आपला संसार नीट चालवायचा होता. समाजात आपली प्रतिष्ठा मिळवून, टिकवून धरायची होती. जिजाबाईच्या कजागपणाला कधीच दोष देता येणार नाही. तुकाराम महाराजांच्या निर्वाणानंतरही जिजाबाईंनी त्यांचा संसार मोठ्या नेटाने चालवला. मोठ्या जिद्दीने आपल्या घराण्याला उर्जितावस्था मिळवून दिली.

मध्यंतरी मी काही कारणामुळे पुण्याला जाऊन आलो. तेव्हा मुद्दाम हून वेळ काढून देहूला जाऊन आलो. महाराजांच्या मंदिरामध्ये जाऊन दर्शन घेऊन आलो. त्यांचे मंदिर व त्यांचे वैकुंठगमन जेथे झाले ती इमारत हे अलिकडील काळातले आहे. महाराजांच्या वंशजांशी बोललो. आता या घराण्याचे नाव मोरे असे आहे. काही काळापूर्वी आंबिले हे नाव बदलले जाऊन मोरे झाले. आता त्यांच्या काळातील काहीही राहिलेले नाही. त्यांच्या जुन्या घराची डागडुजी केलेली आहे. त्यांची रहायची जागा व त्यांचे हस्तालिखिते याच गोष्टी शिल्लक आहेत. नाही म्हणायला त्यांच्या घरी त्यांची मूर्ती आहे. पण ती मूर्ती इतर कोणत्याही संताची म्हणून दाखवता येणे शक्य आहे. एक साधारण माणसा सारखी मूर्ती बनवून त्याला चांदीचे डोळे चिकटवले आहेत. संपूर्ण गावात बघण्यासारख्या या दोनच गोष्टी. आता या पवित्र स्थानाचे पूर्ण व्यावसायीकरण झाले आहे. संबंध देहू गावात जागा भरपूर आहे. चार किडूक मिडूक वस्त्या सोडल्यातर भरपूर मोकळी जमीन आहे. म्हणून शांतता जाणवते. या मोकळ्या जमिनीवर भरपूर त्रिक्रते घेऊन बसले आहे. महाराजांचे घर व त्यांचे निर्वाणस्थान यात थोडे अंतर आहे. मधल्या या अंतरात भरपूर छोटी छोटी दुकाने आहेत. रसाची गुऱ्हाळे, त्यातून

ऐकू येणाऱ्या किरट्या गाण्यांच्या किंचाळ्या, पूजेच्या सामानाची दुकाने, रुपयाभरात देवाची पूजा का म्हणून का असा हुकूम देणाऱ्या दुकानदारिणी, 'घे की रे भाऊ ऽऽऽ असे मागे लागणारे रखवाले. भक्ती मार्गाच्या खडतरपणाचा अनुभव करून देणारे रस्ते, असे एकूण देहू गावाचे स्वरुप आहे. या कोलाहलात माणूस भक्तीमार्गाकडे न वळला तरच नवल.

तुकाराम महाराज हे बीजेच्या दिवशी लोकांसमोरून अदृश्य झाले. त्यांच्या बरोबर त्यावेळी कीर्तन करण्यासाठी आलेले काही आधिकारी शिष्य होते. त्यांनी ''महाराजांना नेण्यासाठी विमान धाडले व महाराज विमानात बसून सदेह गेले'' असे नंतर सांगितले. महाराजांबद्दल ही सविस्तर माहिती कोठेच उपलब्ध नाही. देहू गावात सुद्धा ही माहिती उपलब्ध नाही.

आपल्या हिंदू समाजाची ही पद्धतच आहे. संत ज्ञानेश्वरांसारख्यांनाही याचे अनुभव आले. जिवंतपणी दुस्वास व मृत्यु नंतर उदोउदो ! माणसाची पारख त्याच्या जिवंतपणी न करणे ही आपल्या समाजाची पद्धत चमत्कारिकच आहे. आपल्या समाजामध्ये कथा, दंतकथा, चमत्कार कथा यांचे महत्त्व विलक्षण आहे. म्हणून अनेकदा त्यातला इतिहास गायब होऊन जातो. एखाद्याचे चरित्र लिहिताना सुद्धा सरळपणे घटनाक्रम न देता त्याची रंजकता वाढवणे हेच महत्त्वाचे समजले जाते. रामायण व महाभारत हे ऐतिहासिक ग्रंथ असावेत असे वाटते. पण त्यातला इतिहास हा रामाच्या व कृष्णाच्या मृत्युनंतर गायब झाला व राहिले आहे पुराण !

श्रीसंत तुकाराम महाराज हे केवळ चारशे वर्षांपूर्वी होऊन गेले. पण त्यांच्या दिसण्याबद्दल, बोलण्या-वागण्याबद्दल समकालीन व्यक्तींनी काही लिहून ठेवलेले नाही याचे विलक्षण आश्चर्य वाटते. भारतासारख्या हजारो वर्षांच्या इतिहास असलेल्या राष्ट्राला चारशे साडेचारशे वर्षांपूर्वीची गोष्ट ही अगदी कालची वाटली पाहिजे. आमच्या तरुण पिढीवर बेशिस्तीचे आरोप केले जातात. आम्ही पाश्चात्य संस्कृतीच्या नादी लागून वाहवत चाललो आहोत असे म्हटले जाते. हे स्वाभाविकच आहे. कारण आमच्या इतिहासाची व आमची ओळख ही कधी झालीच नाही. खाद्यतेलाच्या पिशवीवर 'स्टँडर्डाइज्ड', 'ब्लीच्ड', 'डिओडराईज्ड' असे शब्द असतात. घाणीचे तेल आपल्याकडे जसेच्या जसे येत नाही. तसा आपला इतिहास हा 'स्टँडर्डाइज्ड, ब्लीच्ड व डिओडराईज्ड' केला आहे.

श्रीसंत तुकाराम महाराजांच्या वैकुंठगमन स्थानापाशी उभे असताना अगदी अपेक्षा भंग झाल्यासारखे वाटले. महाराष्ट्रामध्ये ज्यांची वाणी सर्व परिचित आहे. ग्यानबा तुकाराम असे म्हणून संत ज्ञानेश्वरांबरोबर ज्यांचे नाव घेतले जाते अशांच्या अवतार गावी त्यांचा एकही ठसा नाही. त्यांच्या हस्तलिखिता मधली काचेच्या कपाटाआडची न समजणारी अक्षरे वाचून समाधान होत नाही. देहूला जाऊन शांतता अनुभवण्याऐवजी अशांत होऊन मी परत आलो.

ज्या ख्रिस्ती मिशनऱ्यांवर हिंदूना बाटवण्याचे आरोप केले जातात, त्यांचे इतिहासप्रेम विलक्षण आहे. येशू ख्रिस्ताच्या प्रेतावर टाकलेली कांबळ अजून जपून ठेवलेली आहे. मुसलमानांनी पैगंबराचे अवशेष 'हजरत बाल' वगैरेसारख्या नावांनी जपून ठेवले आहेत. बौद्धांनी बुद्धांचे अवशेष स्तुपांमध्ये जपून ठेवलेले आहेत. मात्र आम्ही हिंदूच आपल्या देवांचे व संतांचे काही जपून ठेवत नाही. आपल्या ऐतिहासिक स्थळांकडे गेल्यावर निराशा पदरी येते. एखाद्याने परमेश्वर दर्शन घडवण्याचे वचन द्यावे व एखाद्या खोलीत नेऊन उभ्या केलेल्या गाढवाकडे बोट दाखवून ''याचे नाव परमेश्वर'' असे सांगावे असा प्रकार होतो.

तुकाराम महाराजांच्या मंदिरामध्ये गेल्यावर प्रश्नांचे मोहोळे डोक्यात उठले. ते आपल्या समोर मांडण्यासाठी हा प्रपंच !

---

**वासुदेव देशपांडे**
सुचेता, भास्कर कॉलनी, नौपाडा, ठाणे ४०० ६०२

# "एक सुखद अनुभव"

*आपल्या दैनंदिन जीवनातला एखादा साधासा प्रसंगही किती महत्त्वाचा असतो, त्या निमित्ताने आपल्या मनात कसे विचार तरंग उमटतात त्याचा प्रत्यय या लेखात यावा. गेल्या महिन्यातच 'जागतिक महिला दिन' होता हे ही एक औचित्य - संपादक*

मार्च महिन्याचा दुसरा आठवडा ! सर्वच कार्यालयात जमा-खर्च,बिलांची तपासणी, खर्चाचा ताळेबंद करणे. या कामांची गडबड असतेच ! अशाच प्रकारच्या वर्षा अखेरच्या कामांच्या पसाऱ्यात मी अगदी बुडून गेले असतानाच; अचानक गरमागरम बटाटेवडे व छानसा मलई पेढा असलेली बशी समोर आली. मी अगदी आश्चर्यचकित होऊनच ती बशी घेऊन येणाऱ्या शिपायाला विचारले, "अरे, हे अचानक, आणि कशासाठी ?" तेवढ्यात दुसरा शिपाई गरमागरम कॉफीचा पेला घेऊन आला आणि म्हणाला," मॅडम, आपल्या उमेश सावंतला मुलगी झाली, म्हणून आम्ही म्हणजे त्याच्या मित्रांनी आनंदोत्सव म्हणून हा खास बेत केला आहे ! खुशी प्रीत्यर्थ !"

सुधारणावादी (!) काळ म्हणून मुलगी झाली की पेढे / बर्फी वाटली जाते, पण ती बहुधा नाराजीनेच ! किंवा वरकरणी आम्ही मुलगा/मुलगी भेद मानत नाही व आपण ही सुधारक आहोत हे मिरवण्यासाठीच ! शिवाय अशी बर्फी किंवा पार्टी घरातले लोकच देतात. ऑफिसमधे असे पेढे/ बर्फी बरेच वेळा खायला मिळतात पण मित्रासाठी मित्रांनी दिलेली ही खास पार्टी मला फारच अंतर्मुख करून गेली. नेहमी चहा/कॉफी देण्याचे काम उपहारगृहाचा माणूस करतो पण यावेळी स्वखुशीने हे काम ह्या मित्रांनी अंगावर घेतले. एकजण चहा देत होता, तर एकजण कॉफीचे पेले घेऊन होता, एकजण बटाटेवडा/पेढा वाटत होता तर चौथा सर्वांना मिळाले ना कोणी राहिले तर नाही ना ? ह्याची जातीने चौकशी करत होता. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद व आपुलकी ओसंडून वहात होती. हा त्यांचा आपलेपणा, जिव्हाळा मला खूपच भावला, म्हणून अधिक कुतुहलाने चौकशी केली, तेव्हा कळले की, उमेशला बरेच वर्ष मूल होत नव्हते म्हणून तो फार उदास असायचा. सर्वच जण ह्या सुस्वभावी, कामस् व प्रेमळ मित्रासाठी प्रार्थना करत होते आणि ती प्रार्थना सफल झाली होती !

मला सर्वांत कौतुक वाटले ते या गोष्टीचे की कोणालाही (ते चतुर्थ श्रेणीचे कर्मचारी असूनही) मुलगी झाली म्हणून दुःख नव्हते. आज मुलगी झाली म्हणून रडणाऱ्या समाजाला हा खचितच उद्बोधक धडा आहे. मूल झाले, मग ते मुलगा असो वा मुलगी याची पर्वा आम्हाला नाही, ते स्वस्थ व सदृढ होते यातच त्यांना आनंद होता.

दुसरे म्हणजे, आजकाल तथाकथित प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या समाजात असा ओलावा, असे मित्रप्रेम फारच दुर्मिळ झाले आहे ! एकमेकांबद्दल असूया, दुसऱ्यांचा मत्सर वाटणे, एकमेकांचे पाय खेचणे यातच

धन्यता मानणाऱ्या वर्गाला हा अनुभव बरेच काही सुचवून जाईल असे वाटते. मला तर आपण पूर्वीच्या काळात गेलो आहोत असे वाटत होते. पूर्वीचा काळ म्हणजे साधारणत:२०-२५ वर्षांपूर्वी ! आम्ही सर्व मित्र-मैत्रिणी असे सोहळे अगदी उत्साहाने करत असू. समाजातही असा ओलावा तेव्हा टिकून होता. दुसऱ्यांच्या आनंदात सहभागी होताना स्वत:ला कितीही कष्ट पडले तरी त्याचे भान नसे ! हल्लीच्या धावपळीच्या, महागाईने कावलेल्या समाजात हे दृश्य हरवत चालले आहे. खूप वर्षांनी हे दृश्य दिसले आणि मनाला स्पर्शून गेले.

अजूनही समाजात मित्रप्रेम, बंधुभाव, दुसऱ्यांसाठी आनंदाने कष्ट करण्याची तयारी, दुसऱ्यांच्या आनंदात हरवून जाण्याची नि:स्पृह वृत्ती, आणि मुलगा-मुलगी भेद न मानता हौस करणारे लोक आहेत हे पाहून मन आनंदाने खुलले ! नव्या आशेने, माणुसकी आहे तर ! ह्या मित्रांचे कौतुक करावे तेवढे थोडेच !


श्रीमती वेदवती हब्बु
ज. ने. ग्रंथालय,
मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी,
सांताक्रुझ (पू) मुंबई ४०० ०९८
दूरध्वनी (निवास) : ४४९ ६८८२

❑❑❑

दिशा नियमित वाचा
दिशाचे वर्गणीदार व्हा.
संपर्क
५४२९६९७०



# युध्दाच्या छायेत



आभाळात अचानक मेघ दाटून येतात. दाही दिशा अंधारून येतात. उन्हाने त्रस्त झालेल्या सृष्टीत चैतन्याची लाट उसळते. पुढील समृद्धीची ती पाऊले असतात. पण याच जागी वातावरणातील युद्धाचे ढग असतील तर... तर सारेच विपरीत असते. दंड थोपटणे सुरु होते. त्या प्रचंड गर्जनेने डोके उठते. बॉम्बहल्ल्यात उठलेला धूर आणि धुळीच्या वादळात श्वास गुदमरतात. शांतता हवी असे कानी कपाळी ओरडून सांगण्याची वेळ येते. जनसामान्यांच्या हातातील घास गळून पडतात. उद्यानाचे वाळवंट होण्यास वेळ लागत नाही. सर्वत्र हाहा:कार माजतो.

आजच्या घडीला यापेक्षा वेगळे काही चालले आहे, असे म्हणता येणार नाही. फक्त हे युद्ध वेगळे आहे. ऑस्ट्रेलियाच्या युवराजाची हत्या झाल्यानंतर ज्या तातडीने महायुद्ध खेळले गेले, तसे हे युद्ध घाईचे नाही. या युद्धाला अनेक वर्षांची पार्श्वभूमी आहे. या युद्धातील दिशा सांगता येणार नाही. भविष्यवाणीसुद्धा सहाय्यास येणार नाही. या युद्धातील प्रतिस्पर्धीच निराळे आहेत. मुंगी विरुद्ध हत्ती असेच या युद्धाचे स्वरुप आहे आणि म्हणूनच या युद्धाचा निर्णय सांगणे कठीण आहे. युद्ध सुरु झाले आहे. बॉम्बहल्ले सुरु आहेत. पण प्रतिस्पर्धी कुठे आहे ? एक पेहल्वान दंड थोपटत आहे.अविरताने लढतो आहे. पण कुणा विरुद्ध ? अशीच या युद्धाची स्थिती आहे.

अमेरिका हा काही आफ्रिकेसारखा मागास देश नाही. अनेक देशांतील शेकडो बुद्धिवंत आज त्यांच्या मदतीस हजर आहेत. त्यांच्या समृद्धीचे पोवाडे जगाच्या कानाकोपऱ्यात गायले जातात. जगावर त्यांच्या तंत्रज्ञानाची एक दहशत आहे. अमेरिकेच्या एका इशाऱ्याबरोबर वाकणारे अनेक देश या जगात आहेत. या देशाविरुद्ध जाहीर दंड थोपटण्याची कुणाचीही हिंमत नाही. पण असे सारे असताना कुठेतरी माशी शिंकते. ओसामा बिन लादेन नावाचा कुणी दहशतवादी अमेरिकेची सारी अब्रू धुळीस मिळवितो. हे कसे शक्य आहे ? अनेक अद्ययावत यंत्रणांनी सुसज्ज गुप्तहेर संघटना देशातील कट उघड करू शकत नाही. तेथे जगास काय सावरणार ? मुंबई पोलिस खातेच जास्त कार्यक्षम वाटावे अशी अमेरिकेची कामगिरी झाली. स्वत:चे सामर्थ्य वाढविण्यासाठी अमेरिकेनेच पाठबळ दिलेल्या मुस्लिम धर्मांध दहशतवाद्यांनी त्याच अमेरिकेला हादरे दिले. जहरी सर्प सांभाळणे म्हणजे काय असते ? याचेच त्यांनी अमेरिकेला धडे दिले. आणि या हादऱ्यांपुढे अमेरिकेची सारी यंत्रणा निष्प्रभ ठरली. अमेरिकन जनतेची मानसिकता जगापुढे मांडली गेली. चार बलाढ्य इमारती पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणे कोसळल्यावर कोसळणाऱ्या अमेरिकेने भारताला काश्मीर प्रश्नी शांतता व सबुरीचे सल्ले द्यावेत यावरून अमेरिकेची सारी खेळी कळून येते. तालिबानकडे लादेनसाठी हट्ट धरण्यापेक्षा वाटाघाटी का झाल्या नाहीत? याचे प्रेसिडेंट बुश यांनी उत्तर द्यावे.

जगात दहशतवाद आधी नव्हताच. ११ सप्टेंबर घटनेवेळीच तो निर्माण झाला ; अशीच आज साऱ्या भारतीयांची समजूत झाली असावी. काश्मीर प्रश्नांची घोंगडी गेली ५० वर्षे भिजत पडली असताना अमेरिकेला

अंतर राष्ट्रीय दहशतवादाचा बिमोड करण्याची गरज वाटली नाही. किंवा रशियाचे विघटन घडवून आणणाऱ्यांना साह्य करणे नीतीला धरून नाही हेही त्यांना कळले नाही ! कारण या साऱ्या गदारोळात त्यांचे महत्त्व वाढत होते आणि त्यांचे स्पर्धक खचत होते. जगात आपलेच राज्य चालविण्याच्या महत्त्वाकांक्षेमुळे आज अमेरिकेच्या नशीबी ही नामुष्की आली. पण या साऱ्या प्रसंगातही हात कसा राखावा यांचे अमेरिकेला चांगले ज्ञान आहे. पहिल्यांदाच ज्या भूमीवर असा मोठा हल्ला झाला त्या देशाच्या नागरिकांना सावरण्याची जबाबदारी राज्यकर्त्यांवर असते. आपल्या सामर्थ्यावर जनतेचा विश्वास पटावा यासाठी इशारे, हल्ले सारे काही सुरू करणे भाग पडते. आणि तसे घडलेही. पण यापुढेच खरी खेळी होती.

अमेरिके विरुद्ध जाणाऱ्या कुणाचेही या जगात अस्तित्व उरणार नाही; असा संदेशच या युद्धाने दिला आहे. आकाशातून सहज हल्ले करणारी अमेरिकन यंत्रणा प्रत्यक्ष भूमीवर उतरण्यास दिरंगाई करीत आहे. नॉर्दन अलायन्स सारख्या संघटनांना पुढे केले जाते. कारण एकाच मुंगी विरुद्ध हत्ती अशा तऱ्हेने खेळल्या जाणाऱ्या युद्धात बलाढ्य हत्तीला क्षुल्लक मुंग्याकडून चांगलीच चपराक मिळू शकते याचे धूर्त अमेरिकेला भान आहे. भूमीवर युद्ध खेळणे तेही अफगाण सारख्या दुर्गम भागात हे अमेरिकन सैनिकांना वाटते तितके सोपे नाही. तालिबानी सैनिकांचे गनिमी युद्ध कौशल्य साधे नाही. सतत एकाच ठिकाणी हल्ले करून अमेरिकेने काय साधले? अमेरिकेने उद्ध्वस्त केलेल्या ठिकाणांतील मातीच्या ढिगाऱ्यांना सुरक्षित समजून लादेन तिथे लपून बसेल असे त्यांना वाटते का ? की युद्धात खंड पडू देणे त्यांना असुरक्षित वाटते ? युद्धाच्या तयारीसाठी त्यांनी निव्वळ वेळकाढूपणा चालवला आहे. रशिया सारख्या देशांकडून मदत मिळविण्याचा त्यांचा प्रयत्न असावा. कारण या युद्धात त्यांना हात राखायचा आहे. आणि भूमीवर लढाईतही काय साधले जाणार ? हाच प्रश्न आहे.

दहशतवादी विरोधी अंतर राष्ट्रीय मोहीमेत कितपत यश लाभेल यात शंका आहे. पण याच घटनेचा फायदा घेऊन पाकिस्तान अमेरिकेचे साहाय्य मिळवून काश्मीर मधील कारवायांचा जोर वाढवणार. काश्मीर प्रश्नी भारतीयांना दिलेली आश्वासने गंगेत वाहून जाणार आहेत. अमेरिका, तालिबान सरकार उलथून टाकू शकेल. लादेनला ठार करून शकेल पण एका जेहादच्या हाकेने पेटून उठणाऱ्या इस्लामी दहशतवाद्यांना थोपवू शकणार नाही. काही काळ त्यांचे सामर्थ्य कमी होईल पण सूडाने पेटलेल्या त्यांचे भविष्यकाळातील स्वरुप आक्राळ विक्राळ असेल. जग तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर उभे आहे. अशा स्थितीत सामान्यांचे हाल होत आहेत. बॉम्बबरोबरच अन्नाच्या पाकीटांचा वर्षाव करणारी अमेरिका शांतीच्या कल्पनांना सुरुंग लावत आहे. आणि या सुरुंगाच्या स्फोटानंतर उरलेल्या वाळवंटावर अमेरिका सहज राज्य करू शकेल,यात तिळमात्र शंका नाही. तिसऱ्या महायुद्धाचे वर्णन करणारे मेघ आताच जमा होऊ लागले आहेत. त्या काळ्याकुट्ट मेघांत श्वास गुदमरत आहे. हे मेघ बरसल्यास जैविक हल्ल्यांबरोबरच अणु युद्धाची शक्यता नाकारता येणार नाही आणि वालकवींनी या सृष्टीला अनेक स्वर्गीय उपमा दिल्या. त्याच सृष्टीच्या वैराण स्वरुपाला काय उपमा द्यावी ? याचे उत्तर प्रत्यक्ष वालकवींकडेही नसेल.

**सृष्टी अंकोलकर**

बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे

□□□

# नागरिक शास्त्र - स्वरुप

*नागरीक शास्त्र हे प्रत्येक नागरिकाच्या जीवनाशी संबंधित असे मूलभूत शास्त्र आहे. नागरी जीवनाची उणीव माणसाला असंस्कृत बनविते. या नागरीक शास्त्राच्या स्वरूपाबद्दल विचार मांडणारा हा लेख. ज्योती चव्हाण नागरिकशास्त्र व इतिहासाच्या संबंधातील शिक्षण शास्त्रात पुढील संशोधन करणारी विद्यार्थिनी आहे. - संपादक*

शाळेत जाणे म्हणजे शिक्षण ! असा शिक्षणाचा सर्वसामान्य अर्थ गृहीत धरला जातो. शाळेत जाण्यापूर्वी आपल्या मुलाला काही येत नव्हते. परंतु शाळेत किंवा कॉलेजात गेल्यामुळे त्याला शिक्षण मिळाले. कॉलेजातून बाहेर पडल्यानंतर त्याचे शिक्षण खंडित झाले असे इतरांना वाटते. परंतु शाळेतील शिक्षण खंडित झाले तरी, जीवनात काही ना काही तो शिकत असतोच. त्याचप्रमाणे ज्या व्यक्तीने आयुष्यात कधी शाळा पाहिली नाही ती व्यक्ती मूर्ख आहे असे आपण म्हणू शकत नाही. जास्तीत जास्त आपण तिला निरक्षर म्हणू शकतो.

सामाजिक प्रतिष्ठेच्या दृष्टीने आपण पदव्यांना जास्त महत्व देतो. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे, पदव्या प्राप्त करून घेणे हे प्रमुख उद्दिष्ट बनले आहे. पदव्या प्राप्त केल्या म्हणजे शिक्षण मिळाले का ? तर नाही. स्वतःकडे एक ही पदवी नसलेल्या थोर व्यक्तींची उदाहरणे समाजात कमी नाहीत. रवीन्द्रनाथ टागोर हे शालेय जीवनात अयशस्वी झाले तरीदेखील ते अत्यंत प्रतिभावंत होते. तसेच एक शिक्षणशास्त्रज्ञ म्हणून देखील त्यांनी लौकिक प्राप्त केला. त्यांनी सांगितलेले शैक्षणिक विचार आजही आपण अभ्यासतो. त्यामुळे फक्त पदवी घेणे म्हणजे शिक्षण असे म्हणणे चुकीचे आहे.

शिक्षण म्हणजे पुस्तकी ज्ञान नव्हे. ज्या ज्ञानाचा किंवा शिक्षणाचा उपयोग व्यवहारात किंवा प्रत्यक्ष जीवनात करता येत नाही, अशा ज्ञानाला शिक्षण म्हणता येणार नाही. त्यामुळे पुस्तकी ज्ञान घेणाऱ्या व्यक्तींना विद्वत्ता प्राप्त आहे असे म्हणू शकत नाही.

"शिक्षण" या शब्दाचा खरा अर्थ लक्षात घेतल्यास शिक्षण म्हणजे काय ? ह्या प्रश्नाचे उत्तर मिळते. यासाठी शिक्षणाची व्याख्या पुढीलप्रमाणे :

**शिक्षण** - शिक्षण म्हणजे उपदेश करणे व बदल घडवून आणणे या व्युत्पत्तीनुसार गुरुने, शिक्षकाने किंवा ज्येष्ठ वा श्रेष्ठ व्यक्तीने शिष्यात, विद्यार्थ्यांत किंवा कनिष्ठ व्यक्तीत संस्कार करून घडवून आणलेला बदल म्हणजे शिक्षण !

शिक्षण या शब्दाचा इंग्रजी प्रतिशब्द Education. याच्याही लॅटिन भाषेनुसार दोन व्युत्पत्ती दिल्या आहेत.

1) **Educare** - Nourish to bring up
पालनपोषण करणे, वाव देणे
संवर्धन करणे

2) **Educere** - to lead out, to draw out
- व्यक्तीच्या जन्मजात सुप्त गुणांना जागृत करून, चालना देऊन त्यांचा आविष्कार करणे, विकास करणे.

शिक्षणाची व्याख्या इतर ही काही व्यक्तींनी केली आहे ती पुढीलप्रमाणे :

**गांधीजींच्या मते**

"माणसाची शारीरिक, मानसिक व अध्यात्मिक अंगामधील उत्कृष्टतेचा विकास व अभिव्यक्ती म्हणजे शिक्षण".

**विनोबाजींच्या मते**

"शिक्षण कोणतीही गोष्ट नव्याने निर्माण करण्याचे वा, अस्तित्वात आणण्याचे कार्य करीत नाही. सुप्त चैतन्य वा निद्रिस्त शक्ती जागृत करण्याचे एक साधन म्हणजे शिक्षण".

**प्लेटोच्या मते**

" प्रत्येक माणसात काही विशिष्ट प्रमाणात जन्मजात, निसर्गदत्त शक्ती असतात. त्यांना जागृत करून पूर्णत्वाप्रत नेणे म्हणजे शिक्षण."

यावरून शिक्षण म्हणजे व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगिण विकास असे म्हणता येईल.

सर्वांगीण विकासात बौद्धिक, मानसिक, शारीरिक या सर्व गोष्टींचा समावेश होतो. शिक्षणातून या सर्व गोष्टींचा विकास केला जातो. त्यामुळे शिक्षणाची प्रक्रिया फार व्यापक बनलेली आहे. नोकरी मिळवण्यासाठी फक्त शिक्षण घेतले जात नाही. तर व्यक्तीच्या व्यक्तिमत्व विकासासाठी ते उपयोगी पडावे असे उद्दिष्ट शिक्षणाचे असते.

प्रत्येक व्यक्तीत व्यक्तीभेद असतो असे मानसशास्त्राने आपल्याला सांगितले. प्रत्येक मुलाची बुद्धिमत्ता वेगळी, आवडी-निवडी वेगळ्या, इच्छा-आकांक्षा वेगळ्या. ही व्यक्तिगत भिन्नता ध्यानात घेऊन प्रत्येकाला आपल्या बुद्धीनुसार व पात्रतेनुसार शिक्षण घेण्याचे, आपल्या आवडी-निवडीचा विकास करून घेण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे, अशी संधी त्यांना मिळाली पाहिजे.

प्रत्येकाच्या आवडी-निवडीचे विषय वेगळे असतात. विद्यार्थ्यांना स्वतःला आवडणारा विषय, अभ्यासक्रम निवडण्याचे स्वातंत्र्य मिळाले तर त्याची प्रगती चांगली होईल. पुस्तकी ज्ञानाऐवजी विद्यार्थ्यांच्या इतर गुणांचा विकास करणे देखील महत्त्वाचे आहे. स्वतःचा विकास करून घेण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली तर कोणी लेखक, चित्रकार, संगीतकार बनू शकेल. एखाद्याच्या अंगी योग्य नेतृत्व गुण असतील तर तो राजकारणात पुढे जाऊ शकेल. अशा प्रकारे त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा देखील विकास होईल व त्याचबरोबर समाजाचा देखील विकास होईल. शिक्षणक्षेत्रात अपंग विद्यार्थी, मागासलेले विद्यार्थी यांच्या शिक्षणाच्या देखील सोयी केलेल्या आहेत.

प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असले तरी तो समाजाचा व राष्ट्राचा एक जबाबदार नागरिक असतो. व्यक्तीला आपल्या व्यक्ती वैशिष्ट्यांच्या विकासाचे स्वातंत्र्य जरूर असावे. परंतु त्याचबरोबर त्याच्या ठिकाणी सामाजिकतेचा विकास करून सामाजिक व राष्ट्रीय जबाबदारीची जाणीव निर्माण करणे हे शिक्षणाचे एक आवश्यक कर्तव्य ठरते. बुद्धिमान व विद्वान माणसे देखील नागरिकत्वाच्या साध्या नियमांचे पालन करीत नाहीत. सामाजिक व्यवहारात अत्यंत बेजबाबदार रीतीने वागतात. हा आपला नित्यानुभव आहे. याचा अर्थ हाच की, योग्य नागरिकाला आवश्यक अशा गुणांचा विकास त्या व्यक्तीच्या अंगी झालेला नाही. आपल्या देशात नागरिकत्वाच्या भावनेचा अभाव फार मोठ्या प्रमाणात जाणवतो. सामाजिक जीवनातील कोणत्याही दोषाचे किंवा गैरसोयीचे खापर आम्ही सरकारच्या माथ्यावर फोडून मोकळे होतो. परंतु त्याबाबतीत आमची ही काही कर्तव्ये आहेत, काही जबाबदाऱ्या आहेत. याची आम्हांला जाणीव ही नसते. लोकशाहीची यशस्विता, भवितव्य हे नागरिकांच्या गुणवत्तेवर अवलंबून आहे. आमच्या देशातील बहुसंख्य लोक अशिक्षित आहेत हे खरे. तरीही बुद्धिमान व्यक्तीही कमी नाहीत. परंतु जे आहेत ते वैयक्तिक स्वार्थभावनेत गुरफटलेले ! व्यापक सामाजिक हितासाठी व्यक्तिगत हित बाजूला सारण्याची, परोपकारासाठी स्वार्थ भावनेवर तिलांजली सोडण्याची

सामाजिक प्रेरणा व्यक्तीमध्ये निर्माण झाली आहे. सर्जनशीलतेचा व प्रतिभेचा विकास हे शिक्षणाचे ध्येय आहे. परंतु कलावंतानी व प्रतिभावंतानी देखील स्वछंदी वृत्तीने वागून समाजहिताकडे दुर्लक्ष करता कामा नये. त्यांनी आपल्या प्रतिभेचा उपयोग केवळ स्वतःच्या सुखासाठी करण्याऐवजी इतरांच्या हितांसाठी करावा. म्हणून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक दृष्टिकोन , नागरिकत्वाची जाणीव, कर्तव्यनिष्ठा व लोक हितदक्षता निर्माण करण्याची जबाबदारी शिक्षणावर येऊन पडते.

प्रत्येक व्यक्ती फक्त कुटुंबातील सदस्य नाही तर, ती देशाची नागरिक आहे. त्यामुळे कुटुंबाप्रमाणेच देशाने देखील तिला काही अधिकार, कर्तव्ये दिली आहेत. ती तिला पार पाडायची आहेत. यासाठी विद्यार्थ्यांमध्येच राष्ट्रीयतेची भावना निर्माण करणे गरजेचे आहे. आज आपल्या देशात जातीभेद, धर्मद्वेष, भ्रष्टाचार या गोष्टी दिसत आहेत. या वाईट प्रवृत्तींनी देशाच्या एकात्मतेची भावना निर्माण करण्याचे कार्य फार कठीण आहे. तरीदेखील हे कार्य शिक्षणालाच करावे लागणार आहे.

राष्ट्रीय एकात्मतेसाठी जातीभेद, धर्मद्वेष, भ्रष्टाचार कमी झाला पाहिजे. एकत्र येणाऱ्या सर्व व्यक्तींच्या जीवनात समाधान निर्माण झाले पाहिजे. या समाधानासाठी एकत्र राहणाऱ्या व्यक्तीचे सर्वांना मान्य अशा तत्त्वांवर परस्पर संबंध ठरवून नियमन करणे याला आपण '' नागरिकशास्त्र म्हणतो.

२. " परस्पर संबंधीचे तत्वज्ञान म्हणजे नागरिकशास्त्र" प्रत्येक व्यक्तीच्या हक्क व स्वातंत्र्याचे नियमन केले पाहिजे हे नियमन म्हणजे नागरिकत्व. या सर्वांची जाणीव आपण नागरिकशास्त्रातून करू शकतो. म्हणूनच अभ्यासक्रमात नागरिकशास्त्राचा समावेश करण्यात आलेला आहे.

**नागरिकशास्त्राचा विकास**

३. " राज्यघटना बदलत चालली व आणखी ही बदलेल, पण नागरिक कसा बदलणार हा प्रश्न आहे. विनोबाजींसारखे पुरुष नागरिकाने कसे वागावे हे दाखविण्याचा व मानव युग धर्म शिकविण्याचा यत्न करीत आहेत. ते म्हणतात, "दान म्हणजे संपत्तीची फेरवाटणी" जागृत देशात जुन्या शब्दांस नवे अर्थ प्राप्त होतात, व ते त्या काळाचे स्फुरण विषय ठरतात. तसा प्रकार भारतात होत असून तेथे रक्तशून्य शांततामय क्रांती होईल व नवभारत जन्मास येईल. अशी आशा वाटण्यास जागा आहे.

सामान्यतः व्यक्ती स्वतःचे निरीक्षण करण्यापेक्षा इतरांचे निरीक्षण जास्त करते. स्वतःवर टिका करण्यापेक्षा सरकारवर टिका करण्यास व्यक्तीला जास्त आनंद मिळतो हे देखील खरे आहे की, सरकारवर टिका निर्भयपणे करावी आणि करणे देखील गरजेचे आहे. हे सुदृढ लोकशाहीचे लक्षण आहे. पण समर्थांनी असे सांगितले आहे की,

करंटे मिळाले सर्वे । जो तो बुधीच सांगतो।<br>
सांगावे ते आपणाला। आपणू करिता वरे ॥२॥

या विचारांचे महत्व मनात येते. आज जगात विज्ञानात प्रगती झाली आहे. त्यामुळे या विचाराचे महत्व कमी झाले. मानवाचे परस्परावलंबन वाढले. अठराव्या शतकातील मानवात असलेले गुण एकविसाव्या शतकात पुरे पडतील का ? असा प्रश्न मनात येतो. त्यावेळी मानवात कोणते गुण अंगी बाणवले पाहिजे ? याचा विचार समाजसुधारकांनी करायला हवा. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपण प्रातिनिधिक लोकशाही निर्माण केली, ती देखिल अपुरी पडली. हे मालमत्तेबाबत घटनेचे ३१ वे कलम भारतीयांस गेल्या पाच वर्षात दोनदा बदलावे लागले यावरून कळते.

नागरिकांचा कायापालट होतो, तसा घटनेचाही होत असतो. कारण कोणत्याही देशाची राज्यघटना हे देशाच्या सुप्रकृतीचे लक्षण आहे. घटना मुद्दाम बदलून बदलता येत नाही. किंवा चांगले घर बांधून त्यात रहायला जावे तशी आदर्श घटना तयार करून तिचा स्वीकार करता

येत नाही. अंगावरच्या कातडीप्रमाणे ती वाढत्या वयाबरोबर वाढत जाते व प्रकृती निरोगी असेल अशी क्रांती होऊन तिची कांतीही पालटते हा विचार पटत असल्यास आदर्श राज्यपद्धती पेक्षा आदर्श नागरिकत्वाचा विचार अधिक महत्त्वाचा व मूलगामी आहे हे लक्षात येते.

आज स्वतंत्र भारतात नागरिकशास्त्राचे अध्ययन खरोखर समाजाच्या गरजेतून उत्पन्न झाले आहे. समाजाचे स्वरूप आमूलाग्र पालटत आहे. व्यक्तीतील व्यक्तिमत्त्व जागृत होत आहे. नवेच युग या देशात सुरू होऊन आपल्या समाजाचा कायापालट होत आहे. त्याबरोबरच सुशिक्षितांच्या मनाला धर्माचे वर्चस्व मान्य नाही. प्रातिनिधिक लोकशाहीस आवश्यक वाटणारी कर्तव्यनिष्ठा शिकविण्याची पात्रता धर्मात नाही.

समाजात जसा बदल घडून आला तसा धर्मात घडून आला नाही. धर्माचे स्वरूप संकुचित आहे. विसाव्या शतकात योग्य असे कर्तव्यनिष्ठ नागरिक निर्माण होण्यासाठी व अशा नागरिकास कर्तव्यनिष्ठेची व्याप्ती दाखवून देऊन त्यांच्या मनात समाजासंबंधी जरूर ती जबाबदारी उत्पन्न करण्याकरिता नागरिकशास्त्राची शिकवण आज भारताला गरजेची आहे.

समाजात वेगवेगळे प्रश्न निर्माण झाले आहेत. त्याचे स्वरूप पूर्वी पेक्षा वेगळे आहे. काही नव्या गरजा, नवी नाती निर्माण झाली आहेत. नवी क्षितिजे व नवी कोडी दिसून आली आहेत या सर्वांतून मार्ग काढणे गरजेचे आहे. ही क्षितिजे कोणती ? हे प्रश्न कोणते आहेत ? याचा सतत अभ्यास विद्यार्थ्यांना करावा लागेल. कारण प्रत्येक पिढीमागे, जुनी कोडी सुटणार व नवीन कोडी निर्माण होणार. जुनी नाती तुटून नवी निर्माण होतात. जुनी कर्तव्ये अंगवळणी पडणार. तोपर्यंत नव्या कर्तव्याची जाणीव निर्माण होणार ! असा नागरिकशास्त्राचा अभ्यास गतिशील व विकसनशील आहे.

चांगली व्यक्ती, चांगला नागरिक व उपयोगी व्यक्ती घडविणे. हे प्रत्येक शिक्षणाचे उद्दिष्ट आहे. नागरिकशास्त्र विषयातून आपण या उद्दिष्टांपर्यंत सरळ पोहचू शकतो.

### नागरिकशास्त्राचे महत्त्व

नागरिकशास्त्र हे पायाभूत शास्त्र आहे. इतर शास्त्रात जी काही समाजाने प्रगती केली. ती नागरिक शास्त्राच्या मार्गदर्शनाने उपयोगी ठरू शकते. विज्ञानात झालेल्या प्रगतीमुळे मानवाच्या हातात अमर्याद शक्ती आली आहे. वीज, अणुशक्ती याचा शोध मानवाने लावला. याचा वापर देशाच्या कल्याणासाठी केला जाऊ शकतो. त्याप्रमाणेच त्यातून हानी देखील होऊ शकते. याचे चांगले उदाहरण म्हणजे दूसरे महायुद्ध होय. यामुळे नवीन नवीन शोधाबरोबरच मानवी विचारात देखील प्रगती होणे गरजेचे आहे. जागतिक युद्धे, तंटे या गोष्टी मानवाचा दृष्टीकोन विशाल झाल्याशिवाय थांबू शकत नाही. सुखाने जगा व जगू द्या. हे तत्त्व मानवाने स्वीकारायला हवे. सहजीवन आणि सहकार्य याने मानव जीवन जगू लागला तर त्याची खरोखर प्रगती होईल. सहजीवनाचे महत्त्व, सहकार्यापासून मिळणारे फायदे, स्वतःची जाणीव, आदर्श जीवन, समाजातील स्थान आणि समाजाची प्रगती ह्या बाबतीत नागरिकशास्त्र मार्गदर्शन करू शकते.

पूर्वी समाज लहान होता. त्यामुळे समाजातील समस्या कमी होत्या. परंतु आज जग झपाट्याने बदलत आहे. राष्ट्राच्या मर्यादा ओलांडून सर्व जग व अखिल मानवजात एक झाली आहे. संकुचित आणि अप्पलपोटी विचारापेक्षा उदार विचार करण्याची गरज आहे. त्यामुळे नागरिकशास्त्राचा अभ्यास जरूरी आहे. समाजातील व्यक्तीने कशातऱ्हेने वागावे हे सांगण्याचे काम नागरिकशास्त्र करते. हक्काची व कर्तव्याची जाणीव हा देखील नागरिकशास्त्राचा हेतू आहे.

समाजाचा एक घटक म्हणून व्यक्तीने कसे वागले पाहिजे ? कोणते कार्य केले पाहिजे ? कोणती कर्तव्ये पार पाडली पाहिजेत ? याबाबतीत नागरिक शास्त्राचे मार्गदर्शन मिळते. आपण परकीयांच्या गुलामीत होतो. आपल्याला आपला इतिहास घडविण्याचे स्वातंत्र्य नव्हते. परंतु आता आपण स्वतंत्र आहोत. आपल्याला आपल्या भविष्याबद्दल विचार करण्याची गरज आहे. देशापुढील समस्या सोडवून प्रगती घडवून आणावयाची आहे. देशातील दारिद्र्य, बेकारी या समस्या नष्ट करावयाच्या आहेत. आपण जी लोकशाही स्वीकारली आहे ती यशस्वी ठरायला हवी. आपण प्रातिनिधिक लोकशाही स्वीकारली त्यामुळे आपण निवडलेले प्रतिनिधी हे भ्रष्टाचारी, दुर्बल नसावेत, समाजाला योग्य मार्गदर्शन करणारे, कर्तव्यनिष्ठ, दूरदृष्टी असलेले असावे. त्यामुळे समाज जागरूक व सुदृढ होईल. यासाठी नागरिक सुजाण व्हायला पाहिजेत. त्यांच्यात योग्य गुणाची वाढ झाली पाहिजे. समता, बंधुता, सहकार्य, देशप्रेम या गुणांची जोपासना करायला हवी. नैतिक मूल्यांचा ऱ्हास होत आहे, याची जाणीव त्यांना करून द्यायला हवी. हे सर्व कार्य नागरिक शास्त्राकडूनच होण्यासारखे आहे.

नागरिक शास्त्राच्या अभ्यासाने व्यक्तीला योग्य काय ? अयोग्य काय ? याची कल्पना येते. नागरिकशास्त्राच्या अध्ययनामुळे आपले समाजातील स्थान, आपल्याला समाजाला काय द्यायचे आहे ? व समाज आपल्याला काय देतो ? हे व्यक्तीला समजते. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नाही. स्वातंत्र्याची कल्पना प्रत्येकजण आपापल्या परीने लावत असतो, परंतु नागरिक शास्त्राने स्वातंत्र्याची खरी संकल्पना कळते. केवळ अधिकारांबरोबर येणारी कर्तव्य देखील नागरिकाने स्वीकारायला हवी. नागरिकास विचारी बनविण्यासाठी नागरिक शास्त्राच्या अध्ययनाची गरज आहे.

नागरिक शास्त्राच्या अभ्यासाचे महत्त्व मान्य केले तरीही, याचा उपयोग नागरिक आपल्या जीवनात करत नाही. पूर्वी देखील आपल्या देशातील व्यक्तीने एक नागरिक म्हणून कधी ही विचार केला नाही, तर कुटुंबाचा किंवा जातीचा घटक म्हणून विचार केला. व्यक्तीच्या अधिकारापेक्षाही तिच्या कर्तव्यावरच भारतीयांनी भर दिला. म्हणूनच पाश्चात्यांच्या सहवासाने काही लोकांना अधिकाराची जाणीव झाली. परंतु त्यांचे विचार सर्वांनाच पटले नाहीत. तसे पाहिले तर अधिकार व कर्तव्ये हा तर नागरिकत्वाचा एक भाग आहे. समाजाने कर्मकांडाचाच जास्त विचार केला, देवाच्या भक्तीवरच जास्त वेळ घालवला. त्यामुळे देवावरच्या अंधविश्वासावरच त्यांचे जीवन अवलंबून राहिले. माणसांपासून ते दूर होऊ लागले. आपल्या आजूबाजूला असणाऱ्या व्यक्तींबद्दल काय जबाबदाऱ्या आहेत ? याची जाणीव त्यांना पूर्णपणे होऊ शकली नाही. नागरिक शास्त्राचा अभ्यास जसजसा मोठ्या प्रमाणावर केला जाईल तसतशी नागरी जाणिवेची वाढ होण्यास मदत होईल.

शास्त्राचे वेगवेगळे प्रकार आहेत. विज्ञान, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, नागरिकशास्त्र इत्यादी काही शास्त्रे ही आपल्यापुढे आदर्श ठेवीत असतात. काय चांगले, काय वाईट याची चर्चा अशी शास्त्रे करीत असतात; ह्या दृष्टीने असे कळते की, नागरिकशास्त्राची दृष्टी ही नैतिक आणि ध्येयवादी आहे. केवळ वर्तमानकालीन परिस्थितीची किंवा वस्तुस्थितीची चर्चा न करता नागरिकांना कसे वागावे, कसे वागू नये ह्या संबंधी मार्गदर्शन करण्याचे काम नागरिकशास्त्र करते. ते वास्तववादी भूमिका सोडत नाही. म्हणजेच परिस्थितीचे निरीक्षण करून त्या परिस्थितीत नागरिक कशाप्रकारे जगू शकले आणि त्याचे जीवन आदर्श कसे होईल हे नागरिकशास्त्र सांगते.

मनुष्य हा रानटी अवस्थेत असताना एकटा राहत असला तरी तो आता समाजाचा एक घटक म्हणून राहतो. समाजात वेगवेगळ्या संस्था असतात. उदा. कुटुंबसंस्था, शिक्षणसंस्था, सांस्कृतिक मंडळे, कामगार संघ, व्यापारी

संघटना. या संस्थाच्या मदतीने मानव स्वतःची प्रगती घडून आणतो. त्याबरोबरच संस्थाच्या कार्यात देखील सहभागी होतो. ह्या संदर्भात आपल्याला नागरिकशास्त्राची व्याप्ती ठरवावी लागते.

नागरिकांचा ज्या निरनिराळ्या संस्थांशी संबंध येतो. त्या संस्थाच्या कार्याविषयीचे ज्ञान, त्यांचा परस्परसंबंध, त्यांची अधिकार क्षेत्रे, त्या संस्थापासून नागरिकांना मिळणारे फायदे-तोटे या सर्व गोष्टींचा समावेश नागरिकशास्त्र विषयात होतो. नागरिकांची कर्तव्ये व हक्क याबाबतीची माहिती नागरिकशास्त्राकडून मिळत असते. दैनंदिन व्यवहारात परस्परविरोधी निष्ठांचे भांडण चालूच असते, ह्या निष्ठांची योग्य क्रमवारी लावून मार्गदर्शन करणे हे कार्य नागरिकशास्त्र करते. उपलब्ध ज्ञान आणि सध्याची परिस्थिती ह्यांचा विचार आदर्श समाजरचना निर्माण करण्यासाठी होतो. लोकशाही, व्यक्तिस्वातंत्र्य, व्यक्तिविकास, लोकमत इत्यादींचा अभाव नागरिकशास्त्रात येतो. समाज हा काळाप्रमाणे गतिमान होत असतो. त्यामुळे सामाजिक मूल्ये व उद्दिष्टे या वेळोवेळी बदल घडून येत असतो. याचा अभ्यास करून समाजाच्या प्रगतीसाठी कोणत्या सुधारणा झाल्या पाहिजेत आणि कोणत्या गोष्टी आत्मसात केल्या पाहिजेत हे सांगण्याचे कार्य नागरिकशास्त्र करते.

सामाजिक संस्थांचा इतिहास, त्यांची आजची परिस्थिती, भविष्यकाळात त्यांच्याकडून होणारे कार्य याबाबतची माहिती नागरिकशास्त्राने साठवून त्यातून निष्कर्ष काढणे हेच उद्दिष्ट ठेवून चालणार नाही. सामाजिक प्रश्न सोडवण्यासाठी या अभ्यासाचा उपयोग होतो.

या ५१ वर्षांत आपण जोपासलेल्या मूल्यांचे संवर्धन किती केले ? याचा विचार करण्याची आणि त्यातून प्रेरणा घेऊन पुढील वाटचाल करण्याची आज खरोखरीच गरज आहे.

सत्तारूढ पक्ष हा आपल्याला सोयीचे असेल त्याप्रमाणे संविधान पूर्णपणे बदलले पाहिजे या टोकापासून संविधनात जेवढी कलमे आहेत. तितक्या दुरूस्त्या करण्याची भाषा काढण्यापर्यंत मजल गाठीत असतो. हे लोकशाही मूल्यांना जोडून आहे का ? निवडणूकांतून प्रचंड बहुमते मिळतात, आणि ती बहुमते लोकांपासून दूर गेल्यामुळे, सर्व साधन संपन्न असूनही पाहता पाहता कोसळतात. हे देखील आपण पाहिले तेव्हा निव्वळ बहुमत मिळवणे, केवळ निवडणुका जिंकणे, सरकार चालवणे आणि कायदे करणे एवढाचा अर्थ लोकशाहीला आहे ? संसदेच्या सर्वोच्च व्यासपीठावरून आपले खासदार जे जे काही करीत असतात ते समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचत असते ? आणि त्या तळागाळातून ज्या काही समस्या निर्माण होत असतात. त्यांचे प्रतिबिंब या व्यासपीठावर उमटत असते. या सर्वांची कल्पना आपण विद्यार्थ्यांना कशी देणार ? तर आपण नागरिकशास्त्रातून याची जाणीव देऊ शकतो.

शासनपद्धती हा प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाला चौफेर आणणारा प्रश्न आहे. वृत्तपत्र, रेडिओ, टेलिफान, बिनतारी तारायंत्रे, दूरध्वनी, चित्रे, रेडिओ इत्यादी वैज्ञानिक साधनांमुळे शासनाचे विचार हल्ली भिकाऱ्यापासून ते कुबेरापर्यंत आणि बाळापासून ते आजोबापर्यंत प्रत्येकाच्या विचाराच्या सत्तेचे होऊन बसले आहेत. विज्ञानाच्या व लोकशाहीच्या युगात शासनाचे व राजकारणाचे सार्वत्रिकीकरण अगदी अटळ आहे. आजचा विद्यार्थी हा उद्याचा सुजाण नागरिक व्हावा, त्याला नागरिकत्वाच्या क्षमतांची जाण व्हावी आणि राष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक पुर्नरचनेत त्याला विधायक सहभाग घेता यावा. यासाठी या विषयांचे शिक्षण आवश्यक आहे.

४. **प्रा. गेडीज यांनी** - '' नागरिकशास्त्र म्हणजे सामाजिक पाहणीचा किंवा सर्वेक्षणाचा समाजाच्या

सेवेसाठी उपयोग करणे होय'' (Civics is the application of social survay to social service) असे म्हटले आहे.

नागरिकशास्त्राच्या अभ्यासाने व्यक्तीला विशाल दृष्टिकोन प्राप्त होतो आणि समाजाविषयी प्रेम निर्माण होते. यामुळे समाजाची प्रगती घडवून आणण्यास प्रयत्न केले जातात. दैनंदिन व्यवहारात प्रवृत्त करणाऱ्या प्रेरणा शद्वांकित करणे म्हणजे नागरिकशास्त्र होय. आजुबाजूच्या जीवनाचे निरीक्षण, त्याचे आकलन करणारी दृष्टी व त्यातून वर्तन हे नागरिकशास्त्राचे स्वरूप.


१. कुंडले म. बा. : शैक्षणिक तत्वज्ञान आणि शैक्षणिक समाजशास्त्र श्री विद्या प्रकाशन, पुणे २६ जानेवारी १९९६ पृष्ठ क्र. ७.

२. सेवलेकर उत्तम रघुनाथ : खऱ्या शिक्षकाचा शोध, सौमैया ट्रस्ट सहकारित प्रकाशन, १० ऑगस्ट १९६६, पृष्ठ क्र. ४६.

३. ओतुरकर रा. वि. व महाजन गो. हु. नागरिकशास्त्र व भारतीय राज्यपद्धती अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे १९५६ पृष्ठ क्र. २५१.

४. गोखले रामचंद्र : नागरिकशास्त्र व भारतीय राज्यपद्धती आठवी आवृत्ती कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे १९७१, पृष्ठ क्रमांक ४



**ज्योती चव्हाण**

किसन नगर, वेकनाका, ठाणे.

दूरध्वनी : ५८३ १३ ८७


❑❑❑

(मुखपृष्ठ १ वरून)

**संपादकीय**

**पुरस्कृत केलेल्या पुरस्कारांचा वर्षाव**

त्याच चालीवर आपल्या अपरिपक्व विचार व जीवन शैलीचे प्रतिबिंब चित्रपटात उमटते असे म्हणणे वावगे ठरणार नाही. कशाला प्राधान्य द्यायचे, देशासमोरचे खरे गंभीर प्रश्न कोणते आहेत, कोणते प्रश्न सोडवणे तातडीचे आहे याचा विचारच आपण करीत नाही. त्यामुळे माध्यमांतून टोळी युद्धातील कुप्रसिद्ध गुंडाचे पोलीस चकमकीत मारले जाणे 'सुप्रसिद्ध' केले जाते. 'आता उरलो पुरस्कारांपुरता' असे म्हणत पुरस्कार मिळावेत यासाठी अर्ज केले जातात आणि तंबाखू कंपन्या व प्रसिद्ध (!) माध्यमे एकत्र येऊन पुरस्कार सोहोळे पुरस्कृत करतात. जाहिरातीच्या हव्यासापायी जो उठतो तो पुरस्कार वाटत सुटतो. 'आज आता लगेचच' पुरस्कार मिळवण्यासाठी तडफडणारी 'गरीब बिच्चारी' जनता पाहिली की काही कळेनासेच होते. नॉमिनेशन भरून व अर्ज करून स्वतःची पाठ थोपटवून घ्यायची, जणू सारा मोठे पणा, कलेचा गौरव पुरस्कारातच साठवला आहे....

अभिनेते, लेखक यांच्यावर लिहिलेला कोणताही लेख पहा, त्यांच्या अभिनय वा लेखनशैलीचा विचार शून्य असतो. पण पुरस्कारांची जंत्री प्रचंड! जणू काही बायोडाटा हा 'पुरस्कार डाटा' च आहे! गेले तीन चार महिने गंभीर सामाजिक प्रश्न जणू संपलेच आहेत आणि आता फक्त पुरस्कारांचा हंगाम चालू आहे असेच चित्र आहे. देणाऱ्याने देत जावे, घेणाराने घेत जावे आणि अवघे रामायण प्रसिद्ध करीत रहावे असा हा पुरस्कार सोहोळ्यांचा फीवर चालू आहे.

❑❑❑

# सांस्कृतिक जीवन - उत्तुंग व्यक्तिमत्त्वे

*भारतीय संस्कृती समृद्ध करणारी उत्तुंग व्यक्तिमत्त्वे हे भारतीय जीवनाचे वैशिष्ट्य आहे. चैत्र महिन्यात येणाऱ्या वर्षप्रतिपदा, रामनवमी व हनुमान जयंती पार्श्वभूमीवर या लेखातील विचार महत्त्वपूर्ण आहेत. - संपादक*

## सांस्कृतिक जीवन

भारत देश विशाल आहे. समाज खूप मोठा आहे. भारत देशाची एक विशिष्ट परंपरा आहे. विविधतेचे जीवन भारतात आढळते. समाजातील सर्वच मंडळी गुण्या गोविंदाने आज हजारो वर्षे नांदत आहेत. परांगदा झालेल्या ज्यू समाजाला व पार्शी बांधवाना त्यांच्या कठीण प्रसंगी भारतीयांनीच आसरा दिला. आजतागायत तो समाज भारतीय समाजाशी मिळून मिसळून वागत आहे. भारतीय संस्कृतीने अनेकांना आत्मसात केले आहे. अशी ही विशाल संस्कृती आहे. ह्या संस्कृतीची परंपरा शतकानुशतके कशी अक्षुण्णपणे टिकून राहिली आहे व ती समाज जीवनात किती खोलवर रुजली आहे याची माहिती आजच्या नवोदित पिढीला करून देणे आवश्यक आहे.

सांप्रत विज्ञानामुळे भौतिक संस्कृतीचा प्रसार फार मोठ्या प्रमाणात होत आहे. त्या संस्कृती बद्दल वाढत असलेली ओढ व त्याप्रमाणे वागण्याची प्रवृत्ती विशेषत: नवोदित पिढीत बळावत चालली आहे. त्यामुळे स्वयं केंद्रितता, अहंकार, कुर कुरघोडी, संघर्ष, बेपर्वाई या गोष्टी विशेष प्रमाणात आढळतात. याची कारणे अनेक असली तरी सांस्कृतिक जीवनाचे दर्शन घडणे मंदावल्यामुळे त्यांच्या समोर दुसरा पर्याय न राहिल्यामुळे या भौतिक जीवन पद्धतीचा स्वीकार करण्यास आजची पिढी प्रवृत्त होत आहे. आणखी एक कारण, गेली दीडशे वर्षे आपली ब्रिटिशांच्या अंमलाखाली गेली. ब्रिटिशांनी येथील सांस्कृतिक जीवन पद्धतीशीरपणे खच्ची केले. हे लोक भारत सोडून गेल्या नंतरही भौतिक सांस्कृतिक जीवनाचे आकर्षण कमी न होता दिवसेंदिवस वाढतच आहे. स्वातंत्र्य प्राप्ती नंतरही - अर्ध्या शतकानंतरही भारतीय जीवन पद्धतीचा-सांस्कृतिक जीवनाचा स्वीकार इथल्या शासनाने न करता आम्ही 'सेक्युलर' म्हणजे केवळ भोगवादी आहोत असा उद्‌घोष करून भारतीय सांस्कृतिक जीवन नाकारले आहे. (सेक्युलर याचा 'इहलोकीचा व्यवहार' असा अर्थ आहे).

आपल्या परतंत्र काळातही संतांकडून सांस्कृतिक जीवन टिकविण्याचा व्यापक प्रमाणावर प्रयत्न झाला आहे. या साठी विशेषत: महाराष्ट्रात त्यांनी स्वीकारलेली त्रिसूत्री अतिशय व्यवहार्य ठरली. त्यामुळे त्यांना समाज प्रबोधन करणे सुलभ झाले. ती त्रिसूत्री अशी - स्वधर्म, स्वभाषा व स्वराष्ट्र - म्हणजे कर्तव्याचे पालन करणे, लोकभाषेत व्यवहार करणे, उपदेश ग्रंथ रचना आदी तेथील लोकांना सहज समजेल अशी व्यवस्था अपेक्षित होती आणि स्वराज्य स्थापित करण्या विषयी प्रयत्नशील राहणे. महाराष्ट्रात अशा प्रकारचे प्रबोधन झाल्यामुळे स्वराज्य संस्थापनासाठी भूमी तयार झाली. तीनशे वर्षांच्या सतत प्रयत्नानंतर हिंदवी स्वराज्य संस्थापक 'शिव छत्रपतींना' कार्य करण्यास मदत झाली व त्याचे फलित स्वराज्य व स्वराष्ट्र निर्मिती होण्यात झाले. ईश्वर निष्ठेतून देश निष्ठा निर्माण झाली. समर्थ रामदासांनी या बाबत फार मोठी कामगिरी केली. ते म्हणतात, ''देव शिरी धरावा। अवघा हल कल्लोळ करावा।'' भगवंताचे अधिष्ठान स्वीकारून ईश्वर सेवा व देश सेवा एकच, अशी जाणीव जन सामान्यात निर्माण केली. संतांनी आपल्या वर्तनाने स्वधर्म, स्वभाषा,

स्वराष्ट्र या बद्दल योग्य अभिमान जागा करून येथील सांस्कृतिक जीवनाला आकार दिला.

आपल्या वर्षाचा आरंभ चैत्र महिन्यापासून होत असतो. वर्षारंभाच्या दिवशी म्हणजे चैत्र शुद्ध प्रतिपदेला घरोघरी गुढी उभारून आपण या दिवसाचे स्वागत करतो. याच दिवसा पासून प्रभु रामचंद्राचा जन्मोत्सवाचा कार्यक्रम सुरु होतो. नवमीला जन्मोत्सव साजरा केला जातो. भारतात सर्वत्र हा उत्सव फार मोठ्या प्रमाणात साजरा होतो. त्रेता युगातील राम आजही तितकाच लोकप्रिय आहे. त्याच्या जन्मदिनी अक्षरश: हजारो स्त्री-पुरुष उत्सवात सहभागी होतात. तसेच याच महिन्यात रामभक्त हनुमान याचाही जन्मोत्सव चैत्रशुद्ध पौर्णिमेला फार मोठ्या प्रमाणात साजरा होतो. तो रामाचा भक्त असूनही त्याला स्वतंत्र असे देवत्वही प्राप्त झाले आहे.

यांचे उत्सव आपण हजारो वर्षांपासून साजरे करत आहोत. त्या मागील रहस्य समजावून घेतल्यास भारतीय सांस्कृतिक जीवनातील वैशिष्ट्यांचा जरूर परिचय होईल. असे उत्सव साजरे करण्यामागील आपल्या पूर्वजांचा हेतू किती शुद्ध व व्यापक होता हेही ध्यानात येईल. असे तेजस्वी जीवन निर्माण व्हावे यासाठी अथक परिश्रम करण्याची आवश्यकता आहे हे दृष्टी आड करून चालणार नाही. ही चरित्रे भूतकाळाची गौरव गीते नसून वर्तमान कालीन समाजाला प्रेरक ठरणारी आहेत.

मानवतेच्या विकासाचे अंतिम मान चिन्ह म्हणजे चरित्र आहे. जागतिक शक्ती समोर आजही सांस्कृतिक पुनरुत्थानाचे उर्जस्वल स्वरुपात समर्थपणे उभे असलेले श्रीरामाचे व्यक्तिमत्त्व आहे. जन्मापासूनच शुद्ध चारित्र्य असलेल्या राज घराण्यात दशरथाचा जन्म झाला. तो अयोध्येचा पराक्रमी राजा होता. राम हा त्याचा ज्येष्ठ पुत्र. रामाच्या व्यक्तिमत्त्वाची पकड सदैव जनसामान्यावर बसलेली आहे.

**राम हा मनुष्य होता**

राम स्वत: सांगतो, ''आत्मानं मानुषं मन्ये रामं दशरथात्मजम्।'' रावण वधानंतर राम अयोध्येला परतला. त्याचे अभिनंदन करण्याकरता ऋषिमुनी आले. त्यांनी देवत्व चिकटविण्याचा प्रयत्न करताच रामाने स्पष्ट केले मी माणूस आहे व दशरथाचा पुत्र राम आहे. रामाच्या ठिकाणी अनेक मानवी गुण पाहावयास मिळतात.

१) युवराज होणार या कल्पनेने राम आनंदित झाला आहे. कैकेयीच्या महालातून परततेवेळी तो व्यथित झालेला आहे. त्यांनी बरेच वेळा दु:ख आवरले आहे. पित्याच्या वचनपूर्तीसाठी त्याला वनात जावे लागले.

२) त्याला काही प्रसंगी मोह झाला आहे. कांचन मृगाचे रुप धारण केलेल्या मारीच्याचा पाठलाग त्यानी केला आहे. 'असंभवं हेम मृगस्य जन्म तथापि रामो लुलुभे मृगाय'। कालिदास. कांचन मृग असणे अशक्य, तरी देखील राम भाळला.

३) त्याला प्रसंगी क्रोधही येतो - चार महिने उलटून गेले पावसाळा संपला तरी सुग्रीवाकडून सीतेच्या शोधासाठी हालचाल न कळल्यामुळे रामाने लक्ष्मणा करवी सुग्रीवाला कडक शब्दात निरोप पाठविला आणि सांगितले ''सुग्रीवा दिलेल्या शब्दाचे पालन कर अन्यथा वालीच्या मार्गाने तुला जावे लागेल.''

न च संकुचित: पन्था: येन वाली हतो गत:
समये तिष्ठ सुग्रीव मा वालिपथं अन्वगा:।

जीवनाच्या प्रत्येक अवस्थेतून त्याचे व्यक्तिमत्त्व स्पष्ट झाले आहे. तसेच आदर्श पुत्र, आदर्श बंधू, आदर्श मित्र, आदर्श वल्लभ, आदर्श राजा, आदर्श शत्रू म्हणूनही विकसनाचे परिणाम अपूर्व व अनन्य आहे. रामाचे जीवन म्हणजे भावना आणि कर्तव्य यांचा विलक्षण संग्राम आहे. भावनेवर नेहमी कर्तव्याचाच विजय झालेला आहे.

आदर्श पुत्र

१) राम भरताला म्हणतो -

न सर्वे भ्रातरः तात भवन्ति भरतोपमाः
मद्‌विधा वा पितुः पुत्राः सुहृदो वा भवद्‌विधाः।

हे भरता, सगळेच बंधू तुझ्या सारखे आढळत नाहीत, व सर्वच पुत्र माझ्या सारखे असत नाहीत. मी पित्याचे वचन सत्य करण्याकरता वनात आलेलो आहे. पुत्र नावाच्या नरकापासून जो आपल्या पित्याला वाचवितो तो खरा पुत्र होय. पितरांना नरकापासून वाचविणे माझे कर्तव्य आहे. तू ही पित्याच्या वचनाचे पालन कर. तो पुढे म्हणतो - कदाचित चंद्रापासून सौंदर्य ढळेल, हिमालयावरील बर्फ एकवेळ नाहीसे होईल, समुद्र कदाचित आपली मर्यादा ओलांडेल पण मी पित्याला दिलेले वचन कदापि मोडणार नाही.

लक्ष्मीः चं द्रात् अपेयाद् वा हिमवान् वा हिमं त्यजेत्
अतीयात् सागरो वेलां न प्रतिज्ञा अहं पितुः।

२) कैकयी रामाला म्हणते - तू पित्याचे वचन पाळणार आहेस का ? तर मी तुला सांगते. राम म्हणतो माते राजाची आज्ञा असल्यास मी अग्नीत उडी घालीन, विषभक्षण करीन अथवा समुद्रात जल समाधी घेईन. मी पित्याचे वचन पाळीन, तू त्यांची आज्ञा सांग मी तुला वचन देतो राम वेगळे कधी पुनः बोलत नसतो -
करिष्ये प्रतिजाने च रामो द्विः नाभिभाषते।

३) कौसल्येलाही राम निक्षून सांगतो - नास्तिशक्तिः पितुर्वाक्यं समतिक्रमितुं मम। मला पित्याची आज्ञा मोडता येणार नाही, मला वनात जाण्यास अनुज्ञा दे.

४) दशरथाला देखील राम पितृ आज्ञा पाळणाराच, याची खात्री होती तो अन्यथा वागणार नाही याचीच त्याला खंत वाटत होती.

आदर्श बंधू -

भरतावर त्याचे निरतिशय प्रेम आहे. म्हणून तो म्हणतो तुझ्या सारखा बंधू विरळा, त्याला तो खरी हकीकत सांगतो. तुझ्या आईशी लग्न करते वेळी दशरथ राजाने तुझ्या आजोबांना वचन दिले होते. हिच्या उदरी झालेल्या मुलाला मी अयोध्येचे राज्य देईन. राजाने आपले वचन पाळले त्या प्रमाणे तुला राज्य दिले. आता वडिलांची आज्ञा शिरसावंद्य मानून तू अयोध्येचा राजा हो असे सांगितले. दोघा भावांमध्ये सात्विक चुरस होती. निर्लोभिता दोन्ही भावात पराकोटीची आढळते.

आदर्श मित्र -

निषाद अधिपति गुह व वानर अधिपति सुग्रीव. या उभयतांशी रामाचा घनिष्ठ संबंध होता.

गुह म्हणतो - न हि रामात् प्रियतमो यस्यास्ते भुविकश्चन। रामाहून परममित्र या जगात मला नाही. राम अयोध्येला परतल्यानंतर आल्याची वार्ता गुहाला सांगण्यासाठी हनुमंताला त्याच्याकडे पाठवितो. तो माझ्या परम मित्र आहे मी परतल्याची त्याला वार्ता सांग. त्याला आनंद होईल. सुग्रीवाशी मैत्री - हे कपिश्रेष्ठ मी तुझे सर्व कल्याण करण्यासाठी वचन बद्ध आहे. उपकार फलं मित्रं विदितं मे महाकपे। सुग्रीव रावणाच्या अंगावर एकाकी धावला व दैवयोगाने त्याच्या तावडीतून कसाबसा निसटला. हे पाहताच राम त्याला म्हणाला अरे मित्रा तुझे काही बरे वाईट झाले असते तर मला सीता प्राप्त होऊनही काय त्याचा उपयोग.

त्वयि किंचित् समापन्ने किं कार्यं सीतया मम।
त्यावर सुग्रीव म्हणाला - रावणाला पाहताच मी अनावर झालो व बेभानपणे त्याच्यावर तुटून पडलो.

राम शरयूत प्रवेश करतो हे कळताच अंगदावर राज्यभार सोपवून तो त्वरित अयोध्येस आला. रामाला

विनंती करून त्याच्या पाठोपाठ सुग्रीवाने शरयूत आपलेही विसर्जन केले. राजद्वारा पासून स्वर्गा पर्यंत सहजीवन घडण्याचे, मैत्रीचे एक भव्य उदाहरण आहे.

१) भावनेच्या अश्रु पुराने कर्तव्याची सीमारेषा कधीच पुसली गेली नाही. कर्तव्याच्या कठोर दीक्षेने भावनेचे कद्दही दिसले नाहीत. सीतेवर रामाचे आत्यंतिक प्रेम आहे. सीता आश्रमातून नाहीशी झाली हे पाहून तिच्यासाठी केलेला विलाप झाडा दगडाना देखील पाझर फुटेल असा होता. ते त्याच्या उत्कट प्रेमाची साक्ष देण्यास पुरेसे आहे. एकट्या सीतेला सोडून आश्रमातून आपल्याकडे आलेल्या लक्ष्मणाला त्यानी दोष दिला आहे. त्याचे दांपत्य जीवन अति उत्कट असल्याचे वर्णन कवी वाल्मीकीने अरण्य कांडात केलेले आहे.

२) मारुती सीतेला सांगतो -

तुझे दर्शन होत नसल्याने रामाचे डोळे सदोदित ओले असतात. त्याला स्वस्थता वाटत नाही. एखाद्या सिंहाने हत्तीला घायाळ करावे अशी त्याची अवस्था झाली आहे. त्याला झोप कमीच लागते. जाग येताच 'सीते' या नावाने तुला हाक मारीत उठतो. -

अनिद्रः सततं रामः सुप्तोऽपिच नरोत्तमः
सीते ति मधुरां वाणी व्याहरन् प्रतिबुध्यते।

## आदर्श राजा

सीता त्यागानंतर सतत चार दिवस अश्रुलोचन केले. त्या काळात राज्य कारभार पाहिला नाही त्याची रामाला खंत वाटते. तो म्हणतो, लक्ष्मणा, चार दिवस मी राज्यकारभार पाहू शकलो नाही माझ्याकडून फार मोठा अपराध घडला.

चत्वारो दिवसाः सौम्य कार्यं परिजनस्यच
अकुर्वाणस्य सौमित्रे तन्मे कर्मोणि कृन्तति ।

स्व कर्तव्याची केवढी प्रखर जाणीव. तो पौरजनाची नित्य चौकशी करत असे. त्यांच्या अडचणीच्या वेळी मदत करत असे व त्यांचे दुःख निवारण करीत असे. रामराज्यात प्रजा आनंदित व संतुष्ट होती. रामाच्या अंगच्या गुणाने प्रभुदित असे प्रजानन त्याचे अनुकरण करीत असत. त्याच्या राज्यात कोणी दीन, खंगलेला वा दुःखी नव्हता सर्वच प्रजानन खाऊन पिऊन सुखी होते. राम प्रजेला म्हणतो तुमच्यासाठी माझे जीवित ही संपवीन तुमचे सुख प्रथम पाहीन. त्याच्या राज्यात सर्व प्रजा

स्व कर्मसु प्रवर्जन्ते तुष्टाः स्वैरेव कर्मभिःह
आसन् प्रजा धर्मपरा रामे शासति नानृताः ।

## रामाचा प्रभावी पराक्रम.

अंकपन रावणाच्या सेनापती त्याला सांगतो -
रामो राम महातेजाः श्रेष्ठः सर्व धनुष्मताम्।
दिव्यास्त्र गुण संपन्न : परं धर्म गतोयुधि।

राम महापराक्रमी व सर्वश्रेष्ठ धनुंधरही आहे. त्याच्याकडे दिव्य अस्त्रे आहेत. व तो गुणसंपन्न आहे. साक्षात् श्रेष्ठ धर्मच युद्धात अवतरला आहे असे वाटते. मारीच रावणाला सांगतो - नुसत्या 'र' शब्दाने मी घाबरा होतो. रथ, रत्न हे शब्दही मी उच्चारू शकत नाही कारण त्या शब्दात 'र' म्हणजे राम आहे असे मला वाटते. रावणा तू त्याच्या वाटेला जाऊ नकोस.

आर्य राष्ट्राच्या राज दंडाचे खरे स्वरूप रामचंद्रांनी व्यक्त केले आहे. कोणाचेही राज्य नको, संपत्ती नको, खंडणी नको, कशा प्रकारचे ही शोषण नाही धर्म प्रवर्तन हेच महत्त्वाचे.

सीतेचे हरण रावणाने केले नसले तरी रावणाचे पारिपत्य रामाने केले असते. कारण नृशंस नरभक्षक जमात नाहीशी करण्याची प्रतिज्ञा रामाने केलेली होती. वनात फल फूल भक्षण करून राहणारे निरुपद्रवी ऋषी लोकांची राक्षस

कत्तल करीत, त्यांचे रक्षण करण्याचे रामाने त्यांना अभिवचन दिले होते. म्हणून नर मांस भक्षक, स्त्रियांच्या सौंदर्याची शिकार, हे मानवता विध्वंस करणारे स्वरुप होते. पशुता विरुद्ध मानवता असा हा झगडा होता. त्यात पशुतेचे निखंदन करणाऱ्या रामाचा उपक्रम शाश्वत जीवनमूल्याच्या रक्षणाच्या दृष्टीने आवश्यक असेच आहे.

### राम व सीता

रावण वधानंतर रामाने सीतेच्या चारित्र्याबद्दल शंका घेताच ती ताबोडतोब लक्ष्मणाला चिता तयार करावयास सांगते आणि रामाला कठोर शब्दात म्हणते - ममभक्तिश्च शीलं च सर्वं ते पृष्ठतः कृतः। परंतु रामाची योग्यता समजण्याची पात्रता तिच्यात आहे. राम राज्यावर बसल्यावर राणी बद्दलचा लोकापवाद टाळण्यासाठी व सिंहासनाची इभ्रत राखण्यासाठी आपला त्याग रामचंद्राला करावा लागला, हे पाहून या वेळी ती रागावली होती. या ही वेळी रामाचे प्रेम नष्ट झाल्याचे तिला वाटत नाही. रामही अतिशय दुःखी आहे याची जाणीव तिला होत आहे. आपल्या शीला विषयी रामचंद्राचे मन मुळीच कलुषित नाही हे तिला पूर्ण माहीत आहे. आपला परित्याग करणे, त्याला भाग पडत आहे हे समजण्या इतपत तिचे हृदय विशाल आहे. सिंहासनाची इभ्रत ही कोणत्याही व्यक्तिपेक्षा अधिक महत्वाची असते. सीता शुद्ध आहे की नाही हा प्रश्न रामचंद्रासमोर नसून प्रजाजनांच्या अपवादास पात्र झालेली व्यक्ती सिंहासनाच्या राणीपदावर असावी की नाही असा प्रश्न त्याजसमोर होता. त्यासाठी अधिकात अधिक दिव्य करूनही सिंहासनाच्या इभ्रतीचे परिमाण उन्न राखणे हेच राजाचे कर्तव्य होय हे समजून सीता रामाला मुळीच दोष द्यावयास तयार नाही. दुर्दैवाच्या चक्रात आपले जीवन कुस्करले गेले त्याला काहीच इलाज नाही. राजाने कठोर तेनेच कर्तव्य पालन करावे असेच तिचे म्हणणे आहे. ती लक्ष्मणाला सांगते -

मामिकेयं तनुः नूनं सृष्टा दुःखाय लक्ष्मण
वक्तव्यश्च एव नृपतिः धर्मेण सु समाहितः
यथा भ्रातृषु वर्तेथाः तथा पौरेषु नित्यथा
परमोह्येष धर्मस्ते तस्मात् कीर्तिः अनुत्तमा।
अहं तु नानु शोचामि स्व शरीरं नर्षभ।

सीता त्यागाचे हे कारण वाचून राम प्रजाजनाबद्दल किती सोशिक होतो हे ध्यानात येईल. तो म्हणतो -

स्नेहं द्यांच किर्तिं च यदि वा जानकीं अपि।
आराधनाय लोकांना मुच्चतो नास्ति मे व्यथा।

असे मर्यादा पुरुषोत्तमाचे हे चरित्र कर्तव्यो न्मुख नाही असे कोण म्हणू शकेल ? हा त्याचा आदर्श चिरकाल आम्हाला स्फूर्ती देईल.

दुसरे स्फूर्तिदायक चरित्र श्री रामभक्त हनुमान याचे. राम हनुमानाबद्दल म्हणतात -

शौर्यं दाक्ष्यः बलं धैर्यं प्राज्ञता नय साधनम्
विक्रमश्च प्रभावश्च हनुमति कृतालयः।

हनुमंताच्या आश्रयाने हे गुण राहिले होते - शौर्य, दक्षता, वीर्य, धैर्य, शहाणपण, राजकारण, पराक्रम, सर्वत्र प्रभाव साऱ्या गोष्टी हनुमंताच्या ठिकाणी होत्या. याच्या बाहुवीर्यामुळेच मी सीता, जय, राज्य, मित्र व बांधव प्राप्त करू शकलो असे राम लक्ष्मणाला सांगतो.

### हनुमान जन्म व त्याचे बल

अंजनिसुत जन्मतःच सूर्य बिंबाला फळ समजून ते घेण्यासाठी उड्डाण करतो. त्याचवेळी राहू सूर्याचा ग्रास घेण्यासाठी येत होता. हनुमानाला वाटले दोन फळे आहेत. तो त्याजकडे वळला. राहूने इंद्राची मदत मागितली. इंद्र आपल्या वज्राने मारुतीच्या हनुवटीवर प्रहार करतो. हनुमान मूर्च्छित होतो. वायूला हे कळताच तो सर्वत्र वाहणे थांबवतो. इंद्रादी सर्व देव वायूला शरण येतात. ते हनुमानाला

अनेक वर देतात. सर्व देवांनी त्याला अभय दिले. सूर्यापासून त्याला बुद्धी मिळाली, वज्राचा वापर मी कधीही हनुमानावर करणार नाही असे इंद्र म्हणाला. ब्रह्माने त्याची हनुवटी नीट केली. यानंतर तो हनुमान या नावाने प्रसिद्ध झाला. " नाम्नावै कपिशार्दूलः भविता हनूमान इति "।

हनुमान बुद्धिमान होता - बुद्धिमतां वरिष्ठ असे बुध कौशिक ऋषी म्हणतात. त्याचे वक्तृत्व अद्भुत होते. पहिल्या भेटीतच रामाच्या हे लक्षात आले. राम लक्ष्मणाला म्हणतो - याने व्याकरण अभ्यासले असावे. इतका वेळ तो आपल्याशी बोलला त्यात अशुद्ध असा एकही शब्द नव्हता. बोलणे किती मृदू किती असंदिग्ध, उगाच पल्हाळ नसलेले होते. खरोखरच मन जिंकणारे असे त्याचे बोलणे होते. असा माणूस ज्याचा दूत असेल तो खरोखरच काम फत्ते करील.

हनुमंत हा सुग्रीवाचा मंत्री होता व शेवट पर्यंत मंत्री म्हणूनच राहिला. तो राजकारणपटु असल्याने राम हनुमंताशी सल्ला मसलत करी व त्याचे म्हणणे ग्राह्य मानी. बिभीषण त्याच्या साथीदारांसह रामाला शरण आला. याला आपल्या कळपात घ्यावयाचे की नाही याबद्दल बराच विचार झाला. शेवटी रामाने हनुमंताचे मत ग्राह्य मानले व बिभीषणला अभय दिले. त्याला आपल्या सैन्यात घेतले. सगळ्या वानरांचा देखील हनुमंतावर विश्वास होता.

सीता शोधासाठी निघालेल्या पथकात हनुमंत होता. रामाने त्याच्या जवळ सीतेला देण्यासाठी आंगठी दिली. हा निश्चितपणे सीतेचा शोध घेऊन येईल इतका विश्वास हनुमंताच्या ठिकाणी रामाचा निर्माण झाला होता.

**सीता शोध**

ही एक हनुमंताच्या जीवनातील अत्यंत श्रेष्ठ घटना आहे. स्वामी कार्यार्थ सागर ओलांडले. ते करत असताना अनेक संकटांना व प्रलोभनाना यशस्वीपणे तो सामोरा गेला. आपल्या संयमाने बुद्धिचातुर्याने व अंगच्या अनेक गुणाने प्रभूचे कार्य पार पाडले. अशोक वनिकेत सीतेची भेट घेतली. रामाचे कुशल सांगितले त्यांनी दिलेली अंगठी तिला दिली. तिला आश्वस्त केले. तिच्याकडून चिन्हाचा दागिना घेऊन तिचा निरोप घेतला.

आपल्या कृत्याचा वचक निर्माण व्हावा व रावणाचे बळाबळ आजमावावे या हेतूने अशोक वन उध्वस्त करून रावणाने लक्ष वेधून घेतले. रावणाने अनेक वीर पाठविले. मारुतीने त्यांना यमसदनास पाठविले. शेवटी रावण पुत्र इंद्रजित आला त्याने ब्रह्मास्त्राचा वापर केला. त्याला मारुती शरण गेला. त्याला बद्ध करून सभेत आणले गेले. त्याला ठार मारण्याचा रावणाचा विचार बिभीषणामुळे बारगळला त्याच्या शेपटीला आग लावून द्यावी असे ठरले. बऱ्याच चिंध्या बांधण्यात आल्या तेल ओतून शेपटीला आग लावली. मारुतीचे आयतेच फावले. त्यांनी तेथून उड्डाण केले व सर्व वाड्यांना आग लावून दिली. सारी लंका यामुळे पेटली व जळून खाक झाली. लंकादहन करून मारुती परतला. यामुळे रावणाला वानराचा पराक्रम कळला.

अंगी शौर्य वीर्य पराक्रम असूनही त्याच्या ठिकाणी असलेला निर्मम दास्यभाव हा नजरेत भरण्यासारखा होता. रामचंद्राकडे वरदान मागताना हनुमान म्हणतो - हे राजन माझ्या वरील तुझे प्रेम कधी कमी न होवो. तुझ्या ठिकाणी माझी नितांत भक्ती असू दे. तुझ्यापासून माझे मन कदापि विचलित न होवो. तुझी कथा जिथे कुठे चालेल ती ऐकण्यासाठी माझे सतत वास्तव्य राहो. या त्याच्या बोलण्याने रामचंद्र गहिवरले व त्याला हृदयाशी कवटाळले. हनुमंता सारे तुझ्या म्हणण्या प्रमाणे होवो.

राम म्हणाला हनुमंता माझ्यावर तू अनंत उपकार केले आहेस त्याची उतराई माझ्या प्राणाने देखील होवू शकत नाही. कारण प्राण फक्त पांच आहेत तुझे उपकार मात्र अनंत

आहेत. मी तुझ्या उपकाराची फेड करूच शकत नाही. मी तुला फक्त हृदयी कवटाळतो.

थोडक्यात हनुमान हा निःसीम स्वामीभक्त, व निस्वार्थ सेवा यांचे प्रतीक आहे. एक परिपूर्ण निष्ठावान सेवक म्हणून तो साकारलेला आहे. निस्वार्थीपणा बरोबरच नम्रता, कौशल्य या गोष्टींने त्याने महान कार्ये पार पाडली आहेत. त्याच्या ठिकाणी कुठे गर्व ताठरपणा दिसून येत नाही. एवढ्या निलसपणे, भक्तीने, आज्ञाधारकतेने कार्य करणारी व्यक्ती अगर देवता क्वचितच पाहावयास मिळेल. त्याच्या रामभक्तीने आपण मोहून जातो. प्रत्यक्ष राम देखील मोहून गेले आहेत. राम त्याला म्हणाले - तू अत्यंत जवळचा व प्रेमळ असा माझा भरता सारखा भाऊ आहेस. संत तुळशीदास हे हनुमान चालीसात आपल्या रसाळ वाणीने वर्णन करताना म्हणतात - रघुपति किन्हि बहुत बढाई। तुम असा प्रिय भरत हि समभाई।

हनुमान देव आहे ही भावना रूढ झाली आहेच. त्याच बरोबर त्याच्या ठिकाणी आढळणाऱ्या गुणांचाही विचार करणे आवश्यक आहे. जो चिरंजीव आहे तो ब्रह्मचारी आहे, तो बुद्धिमान आहे, तो कुशल योध्दा आहे. तो मुत्सद्दी राजकारणी आहे. तो आकाशात संचार करणारा अचाट कृत्ये करणारा आहे. तो धोरणी आहे. तो सापेक्षी राजकारणी आहे. तो कुशल सेनानी आहे. तो एक उत्कृष्ट नागरिक व सदवर्तनी विश्वासू मित्र आहे. तो उत्तम गायक आहे, तो उत्कृष्ट संगीतज्ञ आहे किंबहुना संगीताचार्य आहे. या सकळ गुणांचा यथायोग्य परामर्श घेतला गेल्यास हनुमान नवोदित पिढीला एक आदर्श म्हणून अनुकरणीय ठरेल.

ही दोनही व्यक्तिमत्वे आज आपली उपास्य दैवते बनली आहेत. यांच्या उभयतांच्या चरित्रावरून आपण सर्वांना खूप काही शिकता येईल.

**श्री. शं बा. मठ**

६, कुमार आशिष, राम मारुती रोड, ठाणे - २

❑❑❑

## माजी विद्यार्थ्यांना आवाहन

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांची माहिती संकलित करण्याचे काम सुरु झाले असून प्राचार्य सी. पी. पाटील यांनी माजी विद्यार्थ्यांना आवाहन केले आहे की त्यांनी महाविद्यालयाशी संपर्क साधून आपली माहिती द्यावी.

महाविद्यालयाचा ईमेल पत्ता :
**bnb@vpmthane.com**

या पत्यांवर आपली माहिती पाठवावी किंवा ५३३ ७६७२ या दूरध्वनीवर प्रा. मोहन पाठक यांच्याशी संपर्क साधावा.

❑❑❑

कोणत्याही क्षेत्रात यश फक्त परिश्रमाने मिळत नाही. त्यासाठी परिश्रमाबरोबरच मुत्सद्देगिरी आणि बदलत्या परिस्थितींची अचूक जाणही असावी लागते.

# भारतातील लोकसंख्या वाढ - एक समस्या

*लोकसंख्या हा आपल्या समोरील ज्वलंत प्रश्न आहे. त्याबद्दल चिंतन असणारा हा लेख. - संपादक*

आज आपण एकविसाव्या शतकात पदार्पण केलेले आहे. जगाची लोकसंख्या ६ अब्जाच्या घरात गेलेली आहे. लोकसंख्येमध्ये चीन, भारत ह्यासारखे आशिया खंडातील विकसनशील देश आघाडीवर आहेत. लोकसंख्या वाढीची अनेक कारणे आहेत. त्यापैकी जन्मदरामध्ये वाढ आणि मृत्यूदरामध्ये घट हे प्रमुख कारण आहे. बालमृत्यूंचे प्रमाण कमी झालेले आहे. वाढत्या वैद्यकीय सुविधा, रोग प्रतिबंधक लसींचा वापर ह्यामुळे साथीच्या रोगांना आळा घालण्यात माणसाला बऱ्याच प्रमाणात यश आलेले आहे. देवी, प्लेग इ. रोगांचे निर्मूलन झालेले आहे. दुष्काळ, पूर, वादळे, भूकंप, ज्वालामुखींचे उद्रेक इ. नैसर्गिक आपत्तींमुळे होणाऱ्या जीवित हानीचे प्रमाण कमी करण्यामध्ये बऱ्याच प्रमाणात मानवाला यश आलेले आहे. आणखी काही वर्षांनी आपला भारत देश लोकसंख्येमध्ये चीनला मागे टाकील, अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. आपल्या देशामध्ये प्रारंभी कुटुंब नियोजन, त्यानंतर कुटुंब कल्याण इ. योजना राबविण्यात आल्या. पण त्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी न केली गेल्यामुळे लोकसंख्या नियंत्रणामध्ये शासनाला अपयश आलेले आहे.

आज आपला देश 'लोकसंख्येचा विस्फोट' अशा स्फोटक स्थितीचा सामना करीत आहे. त्यामुळे काही गंभीर समस्यांना आपल्याला तोंड द्यावे लागत आहे. जन्मणारे प्रत्येक मूल खाणारे फक्त तोंडच घेऊन जन्म घेत नसते, तर काम करणारे दोन हात घेऊन देखील जन्मत असते, हे जरी खरे असले तरी नैसर्गिक साधन संपत्तीला मर्यादा असते. ती लोकसंख्या वाढीचा वाढता ताण पेलू शकत नाही. वाढत्या लोकसंख्येमुळे अन्न, वस्त्र, निवारा, पाणी इ. मानवाच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी नैसर्गिक साधन संपत्तीचा अधिका-अधिक वापर केला जातो. न ती संपुष्टात येते.

अन्नधान्यामध्ये होणारी वाढ ही अंकगणिती श्रेणीने होत असते, तर लोकसंख्येमध्ये होणारी वाढ ही भूमितीय श्रेणीने होत असते. शेतीखालील जमिनीचे क्षेत्र विशिष्ट मर्यादे पलीकडे वाढवता येत नाही. रासायनिक खतांचा वापर करून सुधारित बी-बियाणे वापरून अन्नधान्याचे उत्पादन किती प्रमाणात वाढवता येईल याला देखील मर्यादा पडतात. आज आपल्या देशामध्ये 'हरितक्रांती' झालेली असली तरी मेळघाटासारख्या आदिवासी विभागामध्ये दोन वेळ जेवायला पुरेसे अन्न न मिळाल्यामुळे भूकबळी पडत आहेत. बालके कुपोषण ग्रस्त असून मृत्युमुखी पडत आहेत. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. अजूनही बऱ्याच खेड्यांमध्ये पुरेसे शुद्ध पिण्याचे पाणी मिळत नाही. विकासाच्या विविध योजना शासनाने गेल्या ५० वर्षांमध्ये राबविल्या. विविध पाटबंधारे योजना कार्यान्वित करून, नद्यांवर मोठमोठी धरणे बांधून, शेतीसाठी सिंचनाची सोय करून दिली. परंतु विकासाची फळे सामान्य माणसाला खायला मिळाली नाहीत. लोकसंख्या वाढीमुळे विकास योजनांचे फलित दृष्टोत्पत्तीस येत नाही.

लोकसंख्या वाढीमुळे निर्माण झालेली दुसरी समस्या म्हणजे दारिद्र्य. आपला देश कृषिप्रधान देश आहे. त्यामुळे शेती हेच देशातील ८०% लोकांचे उदर निर्वाहाचे साधन आहे. दर नवीन पिढीमागे शेतीचे अधिका-अधिक तुकडे पडत जातात. आणि प्रत्येकाच्या वाट्याला येणारी जमिन कमी कमी होत जाते. त्यावर अवलंबून असणाऱ्या माणसांची संख्या मात्र वाढत जाते. शेतीचे क्षेत्र सलग नसल्यामुळे ट्रॅक्टर वगैरे वापरून यांत्रिक शेती करता येत नाही. परिणामी शेतीचे उत्पन्न कमी येते. शेतीवर सर्वांचे पोट भरू शकत नसल्यामुळे बहुतेकांना कामधंद्यानिमित्त

शहराची वाट धरावी लागते. यातूनच बेकारीची समस्या निर्माण झालेली आहे. आपली शेती ही बहुतांशी लहरी मान्सूनवर अवलंबून असल्यामुळे सिंचनाची, पुरेशी सोय सर्वत्र नसल्यामुळे शेतीचे दर हेक्टरी उत्पादन फारच कमी आहे. त्यामुळे शेतीवर वाढत्या लोकसंख्येचा चरितार्थ चालू शकत नाही. आपल्या देशामध्ये सुशिक्षित आणि अशिक्षित दोन्ही प्रकारच्या बेकारीचे प्रमाण चिंताजनक आहे. शहरातील कारखाने, उद्योगधंदे, सर्वच बेकारांना रोजगार उपलब्ध करून देऊ शकत नाहीत. मोठमोठे इंजिनियर सुद्धा बेकार आहेत, अशी आपल्या देशामध्ये भयावह परिस्थिती आहे. जगात दर वर्षी सर्वात जास्त पदवीधर आपल्या देशामध्ये निर्माण होतात. सर्वांनाच शासनाने आपल्याला नोकरी द्यावी असे वाटत असते. स्वयंरोजगाराकडे फारच थोड्यांचा कल असतो. त्यामुळे बेकारीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत जाते.

लोकसंख्या वाढीमुळे निर्माण झालेली आणखी एक समस्या म्हणजे निरक्षरता. देशाला स्वातंत्र्य मिळून पन्नास वर्षे झाली तरी देशातील निरक्षरतेचे प्रमाण भीषण आहे. ग्रामीण विभागामध्ये, आदिवासी विभागामध्ये, विशेषतः स्त्रियांमधील निरक्षरतेचे प्रमाण गंभीर आहे. आजही ४०% पुरुष आणि ६०% स्त्रिया निरक्षर आहेत. प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक आणि सक्तीचे असले तरी शासनाकडून होणारे दुर्लक्ष आणि हेळसांड यामुळे प्राथमिक शिक्षणाची फारच आबाळ होत आहे. गळतीचे प्रमाण फारच आहे. आजही एक शिक्षकी शाळा आहेत. एक शिक्षक चार चार वर्गांना शिकवतोय अशी प्राथमिक शिक्षणाची भीषण स्थिती आपल्या देशामध्ये आहे. शिक्षणावर होणारा खर्च अनुत्पादक समजून त्याला प्राधान्य दिले जात नाही. शिक्षणाचा प्रसार खेडोपाडी देखील विविध शासकीय योजनांमुळे झालेला आहे, नाही असे नाही. परंतु त्याचबरोबर शिक्षणाचा दर्जा देखील दिवसेंदिवस घसरत चालला आहे, ही गंभीर बाब आहे.

त्यानंतर लोकसंख्या वाढीमुळे निर्माण झालेली आणखी नवीन समस्या म्हणजे शहरीकरणाची. खेड्यांमध्ये उदरनिर्वाहाचे साधन नसल्यामुळे लोकांचे लोंढेच्या लोंढे शहराकडे वाहू लागल्यामुळे शहरे फुगली, त्यांची लोकसंख्या बेसुमार वाढली. त्याचा नागरी सुविधांवर ताण पडू लागला. शहरातील वाढत्या औद्योगीकरणामुळे उद्योगधंद्यांचे केंद्रीकरण झाल्यामुळे प्रदूषण वाढले. शहरांमध्ये नव्यानेच आलेल्या लोकांच्या निवासाची काहीच व्यवस्था नसल्यामुळे झोपडपट्ट्या आणि बकालवस्त्या निर्माण झाल्या. शहरी लोकसंख्येला पिण्याचे पाणी, वीज, शिक्षण, वैद्यकीय सुविधा, दळणवळणाची सोय इ. गोष्टी उपलब्ध करून देणे नगरपालिका आणि महानगरपालिका यांचे कर्तव्यच असल्यामुळे नागरी सुविधा आणि स्वच्छतेच्या सोयी ह्यांच्यावर प्रचंड ताण पडला. सर्वच हातांना काम मिळत नसल्यामुळे बेकार युवाशक्ती चोऱ्या, दरोडे, खंडणी वसूल करणे ह्यांसारख्या गुंडागिरीकडे वळली. सगळीकडे, अनीतीची बजबजपुरी माजली. Cheap money कष्टांशिवाय पैसा मिळविण्याचे युवकांना आकर्षण वाटू लागले. त्यामुळे मुंबईसारख्या शहरांमध्ये गुंडांच्या टोळ्या निर्माण झाल्या. स्थलांतरितांचे प्रमाण वाढल्यामुळे देहविक्रय करणाऱ्या वेश्यांचे प्रमाण वाढले. आणि विविध सामाजिक समस्या निर्माण झाल्या त्यांचे मूळ वाढत्या लोकसंख्येमध्ये आहे.

'Charity begins at home' ह्या उक्तीप्रमाणे जर प्रत्येकाला आपल्या कुटुंबाचा आकार लहान ठेवल्यास आपले राहणीमान उंचावेल ह्याची जाणीव झाली आणि शासनाने देखील मतांवर डोळा न ठेवता सर्वांसाठी समान धोरण आखून वेळीच कठोर उपाय-योजनांचा अवलंब केला, तरच ह्या लोकसंख्या वाढीच्या भस्मासुराला लगाम घालता येईल.

**श्री. प्रभाकर अरदकर**
सहशिक्षक, श्रीरंग विद्यालय, ठाणे.

# गुण सम्राज्ञी

*स्त्री मुक्ती या विषयी बरंच बोललं जातं. या संदर्भात ८ मार्चला आलेल्या अनुभवांवर आधारित हे विचार. - संपादक*

एका स्त्री-संघटनेन ८ मार्च रोजी महिला-दिना निमित्त १८ ते ४० वयोगटातील महिलांसाठी एक गुणसम्राज्ञी स्पर्धा ठाण्यात आयोजित केली होती. सामान्य-ज्ञानावर आधारित लेखी परीक्षा आणि त्यानंतर दुसऱ्या दिवशी गुण प्रदर्शन (कला सादरीकरण) आणि परीक्षकांनी विचारलेल्या एक/दोन प्रश्नांना स्पर्धकांनी दिलेली उत्तरे असं त्या स्पर्धेचे स्वरुप होते.

स्त्री म्हणजे सौंदर्य हे समीकरण बदलण्याचा कुठतरी प्रयत्न होतोय तिच्या गुणांची चर्चा होतेय असं वाटून खूप अपेक्षा घेऊन स्पर्धक महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी मी एक प्रेक्षक म्हणून तिथं गेले. पण मी जे काही पाहिलं आणि ऐकलं त्यावर मला असा प्रश्न पडला की स्त्री ही नक्की गुलाम कुणाची ? तिच्या स्वतःच्या संकुचित मनोवृत्तीची की आपण म्हणतो तशी पुरुषी वर्चस्वाची ?

एक तर स्पर्धा होती गुणांची. पण सर्वच स्पर्धक स्त्रिया एक, दोन अपवाद वगळता अगदी जमेल तितक्या नटून-थटून आल्या होत्या. त्यांनी घरातल्या अवतारात, गबाळ्या रितीने, स्पर्धेला यायला हवं होतं असं नाही. पण मेकअप, केशरचना, दागिने, भारी साड्या, गजरे हे इतकं सगळं नीटनेटकं, प्रेझेंटेबल दिसण्यासाठी आवश्यक असतं का ?

सर्वच स्पर्धक स्त्रीयांनी सादर केलेले कलागुण हे कधी वैचारिक आनंद देणाऱ्या छंदांपैकी नव्हते (उदा. वाचन, लेखन वगैरे ) मेंदी-रचना, पुष्परचना, केशरचना, झालचं, तर पाककला, रांगोळी, पूजाथाळी सजवणं असे नेहमीचे पारंपरिक कलागुण त्यांनी दाखवले. पण ह्या सर्व कला झाल्या त्यांना गुण का म्हणायचं ते मला कळलं नाही. माझ्या मते गुण म्हणजे मनाची खंबीरता, स्वतंत्र विचारक्षमता, चटकन निर्णय घेण्याची क्षमता, घरात-समाजात आपण एक व्यक्ती म्हणून आदराचं स्थान मिळवणं वगैरे गोष्टी असाव्यात. पण त्याबद्दल कुणीच काही बोललं नाही.

एका स्पर्धक स्त्रीला परीक्षकांनी विचारलं की समजा उद्या तुमच्या पती रावांनं तुम्हांला सांगितलं की हे सगळे छंद, कला वगैरे उद्यापासून बंद. फक्त संसार एके संसार करायचा तर काय कराल ? त्यावर ती गुणवती म्हणाली, '' छंदापेक्षा मी घर, मुलं, नवरा ह्यांना निश्चितच जास्त महत्त्वाचं समजते. त्यामुळे अर्थातच मी छंद सोडून देईन तशी वेळ आल्यास.'' मी धन्य धन्य झाले ते उद्गार ऐकून. जर स्त्रियानांच आजही चूल आणि मूल यातच जीवनाची इति श्री वाटत असेल तर मग पुरुषांविरुद्ध दोषारोप करण्यात काय अर्थ आहे ? अगदी उच्चशिक्षित, तथाकथित स्वावलंबी स्त्रियानांदेखील लग्न, नवरा, मुलं ह्या शिवाय जीवन अपूर्ण वाटते तर मग बाकीच्यांची काय कथा ? घर संसार करण्याची इच्छा वाईट आहे असं नाही. उलट ती स्त्रीची एक नैसर्गिक भावना आहे. फक्त एखादा टक्का स्त्रीयानांच घर-संसारापेक्षा करियर किंवा आपलं व्यक्तीस्वातंत्र्य जास्त महत्त्वाचं वाटल्यान त्या ह्या जंजाळात पडण्याचं टाळतात. पुन्हा त्यातही काही अयोग्य नाही. सर्वांनी संसार केलाच पाहिजे असं नाही. पण स्त्रियांनी आपल्यातल्या व्यक्तीत्वाचा, आपल्या स्वत्वाचा प्रसंगी बळी देऊन ही संसार करावा हे मला फार भयानक वाटतं. घर-संसार करणं म्हणजे घर नीटनेटकं ठेवणे, नवऱ्या-मुलांची बडदास्त ठेवणं. त्यांच्या सर्व गरजा वेळच्या वेळी न चुकता भागवाव्यात असं असेल तर मग आई ऐवजी एखादी आया ही चालू शकेल की (बाई ही चालू शकेल). शिवाय ज्या स्त्रीचं व्यक्तित्व संपन्न नसेल तर ती चांगली व्यक्ती कशी बनेल आणि अगोदर एक चांगली व्यक्ती

बनल्याशिवाय ती आदर्श माता किंवा पत्नी बनेलच कशी? पण विचार करतो कोण ?

त्याच दिवशी एके ठिकाणी महिला मेळावा होता. तिथं एक यशस्वी उद्योजिका अभिमानाने, कौतुकाचे आणि थोड्या विनदाने म्हणाली, '' मी जे काही यश मिळवलंय त्याच शंभर टक्के श्रेय आमच्या ह्यांना आहे.'' मी चाटच पडले. शंभर टक्के ? तर मग तुझी कर्तबगारी ती काय बाई ह्यात ? ती उद्योजिका पुढे म्हणाली, ''ह्यांचा माझ्या कुवतीवर प्रचंड विश्वास आहे. मला कुठलही काम करता येईलच असच त्यांना वाटतं. ते मला नेहमी '' मला रिझल्टस् हवेत'' असच सांगतात. मग कधी कधी मी ही जराशी वैतागाने त्यांना म्हणते - 'रिझल्टस हवेत म्हणजे काय ? प्रत्येक वेळी कस काय रे मला जमेल ?'' वगैरे म्हणजे उद्योगाचा खरा सूत्रधार आहे नवरा. तो आहे एम. डी. (मॅनेजिंग डायरेक्टर) आणि ती आहे सी. ई (चीफ एक्सिक्युटिव्ह) असाच त्याचा अर्थ होतो ना.

त्यानंतर एक प्राध्यापिकेनही आपण जे काही करिअर केल ते केवळ ह्यांच्या पाठींब्यामुळेच असच आवर्जून सांगितल. मला अस जाणवलं की स्त्रियांना घरातून पाठिंवा आणि सहकार्य (अर्थात पुरुषांच) तरच ती पुढे जाऊ शकते हेच बहुतांश स्त्रियांच्या यशाच रहस्य आहे. म्हणजे तिच्या कर्तबगारीचा डोलारा ह्या घरातल्या पुरुषाच्या मर्जीवर उभारलेला असतो हे कटू सत्य आहे. अस असताना मग स्त्रिया पुरुषां इतक्याच कर्तबगार आहेत, खंबीर आहेत, स्वतंत्र झाल्यात वगैरे गप्पा करण्यात काय अर्थ आहे ?

जेव्हा एखादा पुरुष करिअर करतो तेव्हा त्याची पत्नी त्याला सर्वप्रकारे साथ देते. पण त्याबद्दल तो किंवा समाज त्यात तिने काही मोठा तीर वगैरे मारलाय अस काही समजत नाही. हल्लीच जरा कुठे एखाद-दुसरा पुरुष आपल्या यशाच थोडफार श्रेय पत्नीला जात अस सांगताना दिसतो. वास्तविक स्त्रीला आपल्या नवऱ्याला पाठिंवा द्यावाच लागतो. तो गृहीतच धरलेला असतो. शिवाय तिच्या नापसंतीला, हरकतीला, मताला विचारतोय कोण? एखाद्या स्त्रीला मात्र घराबाहेर पडून काही करायचं झाल्यास घरादाराची समजूत काढावी लागते. बाहेर तिने किती ही कर्तबगारी दाखवली तरी तिला तिच्या सांसारिक जबाबदाऱ्यांमधून जरासुद्धा सूट मिळणारी नाही ह्या अटीवर मग मोठ्या उदारमतवादी पणाचा आव आणून तिला काम करायची परवानगी दिली जाते. वाईट एका गोष्टीच वाटतं की ह्यात त्या स्त्रीलासुद्धा कधी गैर वाटत नाही. घर सांभाळून मग जमलं तर करिअर हा नियम ती आनंदाने पाळते. घर आणि करिअर करता करता तिची मानसिक आणि शारीरिक ओढाताण होत असते. मुलांचे लाड, नवऱ्याच्या हौशी पुरवता पुरवता तिची पुरेवाट हाते. पण घरादाराला ? लाडवून तीच ठेवते. 'आमच्या ह्यांना घरचचं जेवण लागत किंवा माझ्या मुलाला शाळेतनं आल्यावर मम्मी हॉर्लिक्स तयार करून सज्ज असावी लागते. जाहिरातीतल्या मम्मीप्रमाणे !' ह्या गोष्टी ती कौतुकाने सांगत असते.

८ मार्च रोजी महिला दिनानिमित्त सर्व महिला एकत्र जमल्या होत्या खऱ्या. पण त्या एक दिवशी सुद्धा फक्त स्वत:विषयी बोलावं, घर-मुले, नवरा विसरून काही जावं काही काळ तरी अस त्यांना वाटत नाही. आणि वाटेल तरी कसं, कारण तिला स्वतंत्र, खास फक्त तिच असं अस्तित्व तरी असतं कुठे ? कार्यक्रमाला थोडा उशीर होत चालल्याने उपस्थित स्त्रिया चुळबुळ करू लागल्या. तशी सूत्र-संचालन करणारी स्त्री म्हणाली, '' मला माहीत अहे की तुम्हाला आता घरचे वेध लागले आहेत. संध्याकाळची चूल पेटवायची आहे. मलाही घरी जाऊन स्वयंपाक करायचा आहे.'' वगैरे वगैरे. स्त्री-मुक्तीचा विजय असो !

**वर्षा गटणे**

अ/३०२, विनायक सोसायटी, पांचपाखाडी रोड, ठाणे

# गीतेतील अध्याय १ ला ।। अर्जुनविषादयोगः ।।

*गीतेवर आजवर अनेकांनी, अनेक दृष्टींनी विपुल लिहिले आहे. माणसाला क्षणोक्षणी विचार प्रवृत्त करणारा हा अमर ग्रंथ आहे. या गीतेतील पहिला अध्यायासंबंधी हा लेख - संपादक*

प्रथम अध्यायाला सुरुवात करण्या अगोदर आपण 'गीता' म्हणजे काय ? त्यात काय सांगितले आहे ? हे समजून घेऊ या.

गीता म्हणजे 'मोक्षदानी स्वतंत्र। ज्ञान प्रधान हे शास्त्र।' असे ज्ञानेश्वर माऊलीने म्हटले आहे. गीता ही अवघड नसून सोपी आहे. ती केवळ परमार्थ सांगत नाही तर ऐहिक जीवन मार्ग दाखवणारी आहे. तिची उपयुक्तता कालातीत आहे.

प्रत्येकाच्या जीवनात बरे वाईट कसोटीचे क्षण येतात. त्यावेळी काय करावे, काय करू नये समजत नाही. दोन किंवा अनेक मार्ग दिसतात. पण कोणत्या मार्गाने जावे कळत नाही. निर्णय घेताना माणूस दडमूढ होतो. संभ्रम निर्माण होतो. कृतीच्या भावी परिणामाने रडकुंडीला येतो हतबल होतो. अशावेळी उपयोगी पडेल असे जीवनाचे निश्चित तत्त्वज्ञान भगवान श्रीकृष्णांनी अशाच अवस्थेत सापडलेल्या अर्जुनाला 'गीता' रुपाने सांगितले आहे. यावरून 'गीता' जीवनाला किती जवळची आहे व उपयुक्त आहे बघा. 'गीता' हा ग्रंथ नुसता गंधाक्षता, फुले वाहून पूजन करण्याचा नाही तर त्याचे वाचन, मनन व चिंतन करून तो आचरणात आणायला हवा. इतर पोथ्याप्रमाणे यात शेवटी याचे वाचन केले तर काय फळ मिळेल हे सांगितलेले नाही कारण 'गीता' कर्म फळ त्याग-निष्काम कर्म -सांगतेय. 'कर्मफळ त्याग' हाच गीतेचा महामंत्र आहे.

कर्म मार्ग हा इहलोकी अभ्युदय, परलोकी उत्तम गती व अंती निश्रेयस प्राप्त करून देणारा असल्याने कर्म टाकू नये कर्मफळ टाकावे हाच संदेश गीतेने वारंवार दिला आहे. कर्म कोणते तर स्वधर्म कर्म. स्वधर्माच्या आड येणारा मोह, ममत्व, आसक्ती दूर करणे हे गीतेचे काम. मोह निराकरण हेच गीतेचे व महाभारताचे उद्दिष्ट असे व्यासांनी महाभारताच्या प्रारंभीच म्हटले आहे. भगवंतानी स्वतः अर्जुनाला ज्ञानामृताचा उपदेश 'गीता' सांगून केला. पराशरसुत व्यासमुनींनी ही गीता महाभारतात गोवली. महाभारताची १ लक्ष संहिता व्यासांनी लिहिली म्हणून व्यासोच्छिष्टम् जगत् सर्वत्र म्हणतात. व्यासांचे महाभारत व वाल्मिकींनी रचलेले 'रामायण' हे आमचे राष्ट्रीय ग्रंथ, त्यातील व्यक्ती आमच्या जीवनाशी एकरुप झालेल्या आहेत. आज हजारो वर्षे त्यांनी सर्व भारतीयांना भारून टाकलेले आहे. या दृष्टीने दोन्ही ग्रंथ अद्भूत. रामायण मधुर गीतीकाव्य तर महाभारत व्यापक समाजशास्त्र. समग्र महाभारताचे नवनीत व्यासांनी श्रीमद्गीतेत दिले आहे. गीता ही व्यासांची मुख्य शिकवण व साठवण आहे. गीता ही उपनिषदांचेही उपनिषद आहे. सर्व उपनिषदांचे दोहन करून हे गीता रुपी दुध भगवंतांनी अर्जुनाच्या निमित्ताने साऱ्या जगताला दिले आहे असे विनोबाजी म्हणतात. जीवनाच्या विकासाला आवश्यक असलेला प्राय: प्रत्येक विचार गीतेत येऊन गेला आहे. म्हणूनच गीता हा धर्मज्ञानाचा कोषच आहे.

'गीता' महाभारताच्या मध्यभागी भीष्मपर्वात सर्व महाभारतावर प्रकाश टाकत उंच दीपस्तंभाप्रमाणे उभी आहे. गीतेचे सातशे श्लोक आहेत. एकीकडे सहा पर्वे व दुसरीकडे बारा पर्वे. तसेच एकीकडे सात अक्षौहिणी सैन्य

व दुसरीकडे अकरा अक्षौहिणी सैन्य अशा मध्यभागी कुरुक्षेत्रावर गीता उपदेशिली जात आहे. गीता सांगणारा कृष्ण, ऐकणारा अर्जुनही कृष्णमय, गीता रचणारे व्यासमुनीही कृष्णरुप असे तिघात अद्वैत झालेले. या तिघांची जणू समाधी लागलेली. गीतेच्या अभ्यासकालाही अशीच मनाची एकाग्रता पाहिजे.

मूळ गीता संस्कृतात. त्यामुळे त्या काळी संस्कृत जाणणाऱ्यांना म्हणजेच ब्राह्मणांनाच ती वाचता येत होती. बाकीचे गीतेला, त्यातील ब्रह्मज्ञानाला पारखे होते. ज्ञानेश्वरांनी मराठीत गीतेवर भाष्य करून 'ज्ञानेश्वरी' ही गीता टीका लिहून ब्रह्मज्ञानाचे चोहऱ्यावर अन्नछत्र उघडले. कोणीही प्रसाद घेऊन जावा. गीता ही समाजातील सर्व थरांतील लोकांसाठी - स्त्री क्षुद्र सर्वांसाठी आहे असे भगवंतांनीच गीतेत सांगितले आहे पण संस्कृत भाषेच्या अडसरामुळे हे ब्रह्मज्ञान कडी कुलुपात बंदिस्त होते ते ज्ञानेश्वरांनी सर्वांसाठी खुले केले. इथे मऱ्हाठीचिये नगरी। ब्रह्मविद्येचा सुकाळु करी। असे ज्ञानेश्वर म्हणतात. फक्त ही गीता ऐकताना श्रोत्यांनी आपले अंत:करण कसे ठेवावे हे सांगताना ज्ञानेश्वर म्हणतात 'जैसे शारदेचिये चंद्रकळे। माजी अमृतकण कोवळे। ते वेचिती मने मवाळे चकोर तलगे॥ ५६.१ पौर्णिमेच्या चांदण्यात फक्त चंद्र किरणांचाच चारा खाणाऱ्या जडणु मनाच्या चकोर पिल्लांप्रमाणे श्रोत्यांनी आपले मन करावे.

एक लक्षात ठेवा हे 'ब्रह्मज्ञान' इंद्रियपातळी वरून घेता येणारे नाही ते आत्म्याच्या पातळीवरून अनुभवता येते म्हणून ज्ञानेश्वर महाराज मन मवाळ, मृदू करायला सांगत आहेत. आत्म्यातून भक्ती भावनेचा स्रोत पाझरला पाहिजे. 'गीता' ही वाङ्मय मूर्ती श्रीहरीची, जसे हे चराचर विश्व भगवंताचेच सौम्य रुप आहे, भगवंताचा प्रकाश आहे.

गीतेवर आतापर्यंत शंकराचार्य, मध्वाचार्य, रामानुजाचार्य इ. संस्कृत पंडितांनी सांगितली. तसेच ज्ञानेश्वर, दासोपंत, वामन पंडित, विष्णुबुवा ब्रह्मचारी, लो. टिळक, योगी अरविंद, पंडित सातवळेकर, विनोबाजी, श्री. ल. प्रभुवाद या संत महंतानीही सांगितली. कुणी द्वैतवर कुणी अद्वैतवर. पण त्यामुळे समाजाचा असा समज झाला की फार अवघड ग्रंथ आहे समजायला, तसेच त्यातील तत्त्वज्ञानाचा जीवनाशी काही संबंध नाही, उतारवयात परमेश्वराचे नाम घ्यावे स्मरण करावे म्हणून लोक स्तोत्र म्हणावे तसे गीता वाचू लागले ( न समजताच) त्यामुळे गीता अंत:करणात बसून कृतीत उतरण्याऐवजी देव्हाऱ्यात जाऊन बसली. गीतेवर हात ठेवून शपथ घेण्यापुरता किंवा स्तोत्र म्हणून पुटपुटण्यापुरताच गीतेचा उपयोग नाही. हा अज्ञान अंधार दूर करण्यासाठी लोकमान्य टिळकांनी 'कर्मयोग' पर 'गीता रहस्य' लिहिले. विनोबांनी तुरुंगात कैद्यांसमोर गीतेवर प्रवचने दिली. ज्ञान आणि कर्म हे दोन पंख आहेत. कोणत्याही एका पंखाने उडता येणार नाही, दोन्ही आवश्यकच. कारण 'ज्ञानाविना कर्म आंधळं तर कर्माविना ज्ञानपांगळं' दोन्ही एकत्र असायला हवीत. हा कर्मयोग लो. टिळकांनी आपल्या 'गीता रहस्यात' सांगितला व गीता समाजाभिमुख केली.

आपल्या सर्वांनाच महाभारताची कथा माहित आहे तेव्हा ती सांगण्यात वेळ न दवडता गीतेचे प्रयोजन काय ? हे आपण बघुया. श्रीकृष्णाला धर्म संस्थापना करायचीच होती. दूरदर्शन वर 'महाभारत' पाहून आपल्याला सर्वांना हे श्लोक माहित झालेले आहेत.

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवती भारत।
अभ्युत्थानमधर्मस्य तदा ऽऽ त्मानं सृजाम्यहम॥७.४
परित्राणाय साधुनाम विनाशायच दुष्कृताम्।
धर्म संस्थात्पनार्थाय संभवामि युगे युगे॥ ८.४

धर्म संस्थापना करण्यासाठी पांडवाचा पक्ष न्याय होता. म्हणून युद्धातील हिंसा मान्य करूनही न्याय व सत्य व धर्म यांना वाचवणे जरूर पांडवाच्या बाजुने अर्जुनाचा

सारथी म्हणून तो स्वतः उभा राहिला.

दुर्जनांचा नाश करण्यासाठी व निष्क्रिय सज्जनांचा जागृत करण्यासाठी गीतेचे प्रयोजन आहे.

परशुरामाने २१ वेळा पृथ्वी निःक्षत्रिय केली ती याच भूमीवर म्हणून धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे.....

श्री कृष्णाची शिष्टाई, धृतराष्ट्राचे मंत्रयुद्ध' सर्वथा निष्फळ ठरल्यावर कुरुक्षेत्रावर कौरव पांडव आपापल्या ११ व ७ अक्षौहिणी सैन्यासह युद्धासाठी सज्ज आहेत. आंधळ्या धृतराष्ट्राला युद्धभूमीवरचा आँखो देखा हाल सांगण्यासाठी व्यास कृपेने संजयाला दिव्य दृष्टी मिळाली आहे. आजच्या दूरदर्शन सारखेच संजयाला युद्ध दिसत होते आणि संवाद ऐकू येत होते.महालात बसल्या बसल्या युद्ध अटळ आहे कळून पण धृतराष्ट्राला आपल्या 'मंत्रयुद्धाचा', संजय शिष्टाईचा पांडवांवर काही परिणाम झाला की नाही ! हे जाणून घ्यायचे होते. (आपली मुले तर मुर्ख आहेत हे तो जाणून होताच. ती ऐकणारी नाहीत हेही त्याला माहित होतेच.) आता 'मंत्रयुद्ध' युद्ध म्हणजे काय हेही थोडक्यात सांगते, हेतुपूर्वक विपरीत विचार मनात भरवून देणे म्हणजे मंत्रयुद्ध. त्यामुळे मनात वैचारिक गोंधळ उडतो. आपण करतो ते बरोबर की चूक हेच कळत नाही. त्यामुळे कार्यावरील लक्ष उडते आपली त्यामागची निष्ठाच डळमळीत होते. हे मंत्रयुद्ध म्हणजेच संजय शिष्टाई. सरल-ऋजू मनाच्या अर्जुनावर त्याचा फार परिणाम झाला. भगवद्गीतेचा पहिला अध्याय म्हणजे अर्जुनाच्या तोंडून 'संजय शिष्टाईच' बाहेर पडली आहे. आपण अधर्म करीत आहोत अशी त्याची भावना 'मंत्रयुद्धाने करून दिली गेली म्हणून धर्मसंमूढ होऊन श्रीकृष्णाला 'धर्म' सांग अशी विनवणी तो करू लागला.

व्यक्तीच्या जीवनात असो वा राष्ट्र जीवनात असो, नवी धर्म संस्थापना संघर्षनेच होते. म्हणूनच भगवद्गीता, सांगायला जीवनाच्या तत्त्व चिंतनाची पार्श्वभूमी या दृष्टीने कुरुक्षेत्राची निवड योग्य ठरते. वास्तविक पाहता शेकडो लढाया खेळलेला अर्जुन महावीर होता. नेहमी विजय मिळवणारा सर्व नरातील नरश्रेष्ठ होता. वीरवृत्ती त्याच्या रोमारोमात होती. त्याला डिवचण्याठी कैलैव्याचा (षंढ, पुरुषत्व नसलेला) आरोपही कृष्णाने करून पाहिला पण तो बाणही फुकट गेला नि पुढे वेगळ्याच मुद्द्यावर ज्ञान विज्ञानाची व्याख्याने द्यावी लागली. 'ज्ञान विज्ञान' कशाला म्हणतात ते पुढे आपण पाहणारच आहोत.

युद्ध अटळ आहे हे कळूनच तो रणांगणावर कर्तव्य भावनेने आणि कृतनिश्चयाने उभा होता. शत्रू पक्षात कोण कोण असणार आहेत याची त्याला कल्पना नव्हती असे नाही. पण प्रत्यक्ष दर्शनाचा परिणाम होऊन त्याच्या हृदयात कालवा कालव झाली. स्वजन पाहून त्याच्या मनात शोका प्रमाणे अहिंसा वृत्ती निर्माण झाली नाही स्वजन नसते तर सपासप त्याने शत्रूंची मुंडकी बाण मारून उडवली असती. पण आसक्तीजन्य मोहाने त्याची बुद्धी ग्रासली. हा सर्व मंत्रयुद्धाचाच परिणाम आणि तो जाणून घेण्यासाठीच धृतराष्ट्र संजयाला प्रश्न करतो आहे हे संजया, पुण्यभूमी अशा कुरुक्षेत्रावर युद्धासाठी जमलेल्या माझ्या पुत्रांनी व पांडवांनी काय केले' हा एवढा प्रश्न विचारून धृतराष्ट्र संपूर्ण गीतेत स्वतः गप्प राहून त्याने संजयाला बोलते केले आहे.

संजयाचे समालोचन इथून चालू होते ते गीतेच्या अखेर पर्यंत. कौरवांच्या बाजूने व पांडवांच्या बाजूने कोण कोण रथीमहारथी उभे आहेत. त्यांनी व्यूह रचना कशाप्रकारे केली आहे याचे तपशीलवार वर्णन संजयाने केले आहे. भीष्म, द्रोण, कृपाचार्य हे कौरवांचे अन्नखाऊन मिंधे होते म्हणून तो पक्ष अधर्माचा आहे हे कळत असूनही त्याबाजुने उभे आहेत. भीष्मांची अंतस्फूर्ती (मनाने) पांडवांकडून नि बहिस्फूर्ती (देहाने) कौरवांकडून आहे. प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्ण पांडवांकडून अर्जुनाच्या रथाचे सारथ्य करत आहे.

शत्रू पक्षात कोण कोण आहेत हे न्याहाळण्यासाठी अर्जुनाने भगवंताला रथ दोन्ही सैन्याच्या मध्ये न्यायला सांगितला. युद्धभूमीवर रणवाद्ये वाजू लागली. प्रत्येकाने आपापले शंख फुंकले. तो नाद नभ मंडळ भेदून वर गेला. श्रीकृष्णाने 'पांचजन्य' अर्जुनाने 'देवदत्त' भीमाने पौण्ड्र, युधिष्ठिराने अनंत विजय, नकुलाने सुघोष व सहदेवाने मणिपुष्प हे शंख फुंकले. कौरवांच्या शंखाची नावे गीतेत सांगितलेली नाहीत. आता युद्धाला तोंड फुटणार इतकी सिद्धता झाली होती. अर्जुनाने शत्रू पक्षातील स्वजनांचे निरीक्षण केले. नि गुरु, बंधू, मेव्हणे, काका, मामा, श्वसूर वगैरे आप्तस्वकीय जनांना बघून तो कमालीचा शोक व मोह ग्रस्त झाला. त्याच्या हातातून गांडीव गळून पडले, शोक विव्हळ होऊन तो गलितगात्र झाला, तोंडाला कोरड पडली. त्याला उभे राहण्याचेही त्राण उरले नाही.

तो भगवंताला म्हणाला 'मला युद्ध करायचे नाही. मला स्वजनांना मारून ते रक्तलांच्छित राज्य सिंहासन नको. त्रैलोक्याचेही राज्य दिले तरी नको मग पृथ्वीचे काय त्यापुढे ! मला सुखोपभोग नकोत. युद्धाने कुलक्षय होईल, पाप लागेल. कुळधर्माचा नाश होईल. कौरवांना धर्म-अधर्म कळत नसला तरी आम्हाला कळतो ना ! म्हणून मी पापाचा धनी होऊन नरकात जाणार नाही, त्यापेक्षा भीक मागितलेली काय वाईट ! मी हातात शस्त्र धरले नसतांनाही त्यांनी मला मारले तरीही चालेल. पण मी युद्ध करणार नाही. त्यापेक्षा संन्यास घेतलेला काय वाईट !

अर्जुन हाडाचा क्षत्रिय होता, आतापर्यंत स्वजनांशीही त्याने युद्धे खेळली होती. पण याचवेळी तो असा हतबल झाला याचे कारण म्हणजे धृतराष्ट्राच्या 'मंत्रयुद्ध' युद्धाचा, संजय शिष्टाईचा धृतराष्ट्राला अपेक्षित असा अर्जुनावर झालेला प्रभावी परिणाम. युद्ध हे क्षत्रियाला स्वधर्म कर्म आहे पण मोहाने ते कर्तव्य तो टाळू पहात होता. आणि गीतेची ह्या मोहावरच मुख्य गदा आहे.

स्वधर्म कर्म म्हणजे काय हेही थोडक्यात पाहून पुढे जाऊ. स्वधर्म कर्म म्हणजेच स्वकर्तव्य कर्म. आता शिक्षकाचे स्वकर्म, स्वधर्म कर्म कुठले तर ज्ञान दान, विद्यार्थ्यांचे ज्ञानग्रहण. माता पित्याचे अपत्य संगोपन, पालन पोषण हे तर मुलांचे वडिलधाऱ्यांचे आज्ञापालन हे. शिंप्याने कपडे शिवावे, सोनाराने अलंकार घडवावे, धोब्याने कपडे धुवावे, इस्त्री करावेत, सुताराने फर्निचर बनवावे वगैरे वगैरे, म्हणजे ज्याने त्याने आपले कर्तव्य कर्म चोख करावे, त्याच्या आड काहीही येता कामा नये हेच गीतेला सांगायचे आहे.

अर्जुन शब्दाचा अर्थच सरळ मनाचा, ऋजू मनाचा. म्हणूनच त्याच्यावर परिणाम होऊन तो अहिंसेची संन्यासाची भाषा बोलू लागला. त्याला संन्याशाचा वेष घेता आला असता पण सन्याशाची वृत्ती कशी घेता आली असती ! अरण्यात तो हरणे मारीत बसला असता. तुझा क्षत्रियधर्म तुला लढायला लावल्याशिवाय राहणार नाही जरी तू नाही म्हणालास तरी. स्वधर्म मोठा म्हणून घ्यायचा नसतो, लहान म्हणून टाकायचा नसतो. माणूस सूर्य आवडतो म्हणून सूर्याजवळ गेला तर चालेल का ? (राहिल का ?) श्रीमंत माणूस म्हणाला मला परवडतं म्हणून मी मासे दूधात ठेवीन तर दूधात ते जगतील का ? ज्याचीजी खरी वृत्ती (स्वभाव) असेल तदनुसार त्याचा धर्म राहिल.

अर्जुनाच्या मनाची अशी द्विधा अवस्था झाली म्हणून तो भगवंताला शरण गेला. वस्तुतः तो आधीचाच कृष्णशरण होता. कृष्णाला सारथी बनवून घोड्याचे लगाम त्याच्या हातात सोपविण्याची तयारी केलेली होतीच आणि त्याने तसेच केले. आपण पण असेच करूया. तुम्ही म्हणाल अर्जुनाला कृष्ण होता आपल्याला कोणता कृष्ण ! पण हे लक्ष्यात घ्या. कृष्ण ही कोणी व्यक्ती नव्हे तो प्रत्यक्ष परब्रह्म.

वासुदेव या शब्दाचा अर्थ वसुदेव पुत्र कृष्ण असा नव्हे. वासू - Universal वैश्विक देव - Soul आत्मा,

म्हणजे आता वासुदेव म्हणजे 'विश्वाचा स्वामी'. विश्वावर अधिराज्य गाजवणारा स्वामी याअर्थी वासुदेव. मग त्या परब्रह्माचे आपणही अंश आहोत. कृष्ण प्रत्येकाच्या ह्दयात आहे आपण त्याला शरण जाऊया. मग तो आपलेही सारथ्य नक्कीच करेल. आपल्यालाही श्रीमुखाने गीता सांगेल.

गुरुजनांचा आदर, सन्मान करणे हेही अर्जुनाचे कर्तव्य होते आप्त स्वकीयांना सुखी करणे हेही कर्तव्यच. व क्षत्रिय आहोत म्हणून युद्ध करणे हेही कर्तव्यच. पण गुरुजनांशी युद्ध! त्यांची सेवा त्याला निर्णय घेता येईना. तो गांगरला, गोंधळला, गडबडला स्वजनांशी युद्ध करून रक्तलांच्छित राज्य घेण्यापेक्षा संन्यास बरा. भिक्षा मागितलेली काय वाईट म्हणू लागला. त्याच्या शरीराला कंप सुटला तो म्हणाला मी निःशस्त्र राहून प्रतिकार करत नसतानाही मला रणात सशस्त्र कौरवांनी मारले तर अधिकच कल्याण होईल माझे. आपल्या मनात आलेले विकार व विचार सरळ मनाने अर्जुनाने श्रीकृष्णापुढे मांडले.

अशा प्रकारे युद्धक्षेत्रावर भाषण करून शोकविव्हल झालेला अर्जुन बाणासह धनुष्य टाकून रथात पटकन खाली निःस्तब्ध बसला असे संजय म्हणाला. आणि इथेच 'अर्जुनविषाद योग' हा पहिला अध्याय समाप्त झाला.

**आशा भिडे**
बी/९, विजय अपार्टमेंट्स
आराधना टॉकीज जवळ, ठाणे (प) ४०० ६०२
फोन : ५४ १०१४०

*यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ग्रंथालय व माहिती शास्त्र पदवी परीक्षेचा एक अनिवार्य भाग म्हणून विद्यार्थ्यांना प्रकल्पाच्या रूपाने एक संदर्भ साधन बनवावे लागते. या अंतर्गत सूची किंवा कोश असा पर्याय ते निवडू शकतात.*

*वि. प्र. मंडळाने आमच्या महाविद्यालयात चालविलेल्या अभ्यासक्रमात फार महत्त्वपूर्ण 'Data Base' तयार झाला आहे. स्थानिक लेखक कवी यांच्या साहित्याची सूची, ठाण्यातील संस्थांची सूची, परिसरातील अभियांत्रिकी महाविद्यालयांची सूची, गीतेतील तत्त्वज्ञानात्मक संकल्पनांची सूची इ. संदर्भ साधने तयार आहेत. यातील काही प्रकल्प पुस्तक रूपाने आल्यास अभ्यासकांची मोठीच सोय होईल. तरी याबाबत ज्यांना अधिक जाणून घ्यावयाचे आहे, प्रसिद्धीच्या दृष्टीने मदत करायची आहे अशा जाणकार वाचकांनी आमच्या महाविद्यालयातील ग्रंथालयाशी संपर्क साधावा.*

*सी. जी. पाटील*
*केंद्रप्रमुख व प्राचार्य*
*बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे.*

## पर्यटन विषयक विशेष माहिती देणाऱ्या सरकारच्या अधिकृत साईटस्

www.tourisminindia.com - भारत सरकारचे पर्यटन खाते
www.tourindia.com
www.aptourism.com - आंध्रप्रदेश
www.darjeelingtourism.com - दार्जिलिंग
http://travel.vsnl.com/dtdc : - दिल्ली
www.infoindia.com/tcgl - गुजरात
www.allindia.com/gujtourism
www.himachaltourism.com - हिमाचल प्रदेश
www.hpdc.com
www.indiaseek.com/karnataka/tourism
www.http://web.delhi.nic.in/mmapd/karn-tour - कर्नाटक
www.keralatourism.com - केरळ
www.ktdc.com -
www.maharashtra.gov.in - महाराष्ट्र
www.goacom.com/goatourism
www.net.in/pondicherry - पाँडिचेरी
www.inctindia.com/rajasthan - राजस्थान
www.tamilnadutourism.com - तामिळनाडू
www.uptourism.com - उत्तर प्रदेश

## नकाशे उपलब्ध करून देणाऱ्या साईटस्

www.mapsofindia.com
www.maps.com
www.theodora.com/maps
www.mapquest.com
www.expedia.com
www.allindia.com/gujtourism
htt://sunsite.sut.ac.jp/asia/india/maps

## हवामानाविषयक माहिती देणाऱ्या साईट्स

www.tropnet.ernet.in
www.met.rdg.aciuk/shiva/dica/afoel.html
www.globalwarming.org
www.ktdc.com
www.weather.com

# परिसर वार्ता

## पॉलिझिन प्रकाशित

" आयुष्याकडे सकारात्मक दृष्टीने पहायला शिका. नंतर काय होणार या भीतीपोटी आताच्या क्षणातील आनंद वाया घालवू नका" असे उद्‌गार प्रसिद्ध कवी श्री. निरंजन उजगरे यांनी विद्याप्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनातील पॉलिझिन या वार्षिकाच्या प्रकाशन समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना काढले. महाविद्यालय परिसरातील थोरले बाजीराव पेशवे सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांनी भूषविले होते.




पॉलिझिन प्रकाशन समारंभाच्या वेळी डावीकडून प्रा. डी. के. नायक, प्राचार्य सी. श्री. मुजुमदार, डॉ. वा. ना. बेडेकर, श्री. निरंजन उजगरे, प्रा. सौ. पाध्ये.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलाने झाली. प्रा. लुकतुके यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी ईशस्तवन सादर केले तर अमेय फडणीस या विद्यार्थ्याने श्री. उजगरे यांचा परिचय करून दिला. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात श्री. उजगरे यांनी पॉलिझिन मधील साहित्याबद्दल प्रशंसोद्गार काढले. या प्रकाशन समारंभात राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या पदविका परीक्षांतील गुणवंत विद्यार्थ्यांचा उजगरे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. तंत्रनिकेतनाचे प्राचार्य सी. श्री. मुजुमदार यांनी वर्षभरातील घडामोडींचा अहवाल सादर केला. प्रा. विद्याधर बालावलकर यांनी केलेल्या आवाहनानुसार गोध्रा येथील हत्याकांडात व नंतरच्या दंगलीत मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना दोन मिनिटे स्तब्धता पाळून श्रद्धांजली वाहण्यात आली. समारंभाचे व विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या अध्यक्षीय भाषणाने कार्यक्रमाचा समारोप झाला.

कार्यक्रमाचे सूत्र संचालन तृतीय वर्षातील संकेत देशपांडे याने केले तर या वार्षिकाच्या संपादिका प्रा. सौ. पाध्ये यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमास उपप्राचार्य डी. के. नायक, तंत्रनिकेतनातील विद्यार्थी व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वि. प्र. मं. तंत्रनिकेतनात महिला दिन

८ मार्च या जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून वि. प्र. मंडळाच्या तंत्रनिकेतन आय्. एस्. टी. इ. चॅप्टर तर्फे एक विशेष कार्यक्रम संयोजित करण्यात आला. आदीबाई महाविद्यालयातील मानसशास्त्र विभागाच्या प्रमुख प्रा. पसारकर यांनी तणावांचे व्यवस्थापन (स्ट्रेस मॅनेजमेंट) या विषयावर या वेळी मार्गदर्शन केले. आपला व्यवसाय व घर यांची सांगड घातली तर ताण कमी होतात असे मत त्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे आयोजन आय्. एस्. ई. च्या प्रा. गीताली इंगवले यांनी केले.

## प्रदर्शन

वि. प्र. मंडळाच्या तंत्रनिकेतनातील तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी बनविलेल्या प्रकल्पांचे एक प्रदर्शन अलीकडेच भरविण्यात आले होते. या प्रदर्शनात पहायला येणारे विद्यार्थी व प्राध्यापक यांना आपला प्रकल्प विद्यार्थी प्रात्यक्षिकांसह सादर करून दाखवित होते.

१६ मार्च २००२ रोजी विद्याप्रसारकाच्या तंत्रनिकेतनातील तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी I. S. T. E. Validictory समारंभ मोठ्या उत्साहाने पार पाडला. ह्या कार्यक्रमाला श्रीयुत M. L. Diwan (Consultant) हे प्रमुख पाहुणे लाभले. त्यांनी 'Decipline & how to acheive your goal with sincere effort' ह्या विषयावर आपले विचार मांडले. Student's chapter चे प्रेसिडन्ट, वाइज प्रेसिडन्ट, सेक्रेटरी, जॉइन्ट सेक्रेटरी ह्यांनी आपले विचार मांडले. I. S. T. E. Student Chapter च्या Activities मुळे Organising capacity, Leadership quality, Team work, अशा आणि अशा प्रकारच्या अनेक गुणांना वाव मिळण्यात मदत होते, असे I. S. T. E. Student च्या अध्यक्षाने सांगितले.




प्राचार्य श्री. मुजुमदार मार्गदर्शन करताना.

ह्या कार्यक्रमानंतर 'तृतीय वर्ष समारोपाचा' कार्यक्रम पार पडला. प्राचार्य श्री. मुजुमदार, उपप्राचार्य डी. के नायक, प्रा. वड्डे व I. S. T. E. Student सेक्रेटरी प्रा. गीताली इंगवले ह्यांनी मार्गदर्शन पर भाषण केली. तृतीय वर्षीय विद्यार्थ्यांच्या (President, Vice President, Secretaries & Joint Secretaries) च्या अथक परिश्रमाने हा कार्यक्रम उत्तम रीतीने पार पडला.

## तंत्रनिकेतनाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने

१५ मार्च २००२ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाची सातवी नियंत्रक समितीची (गव्हर्निंग बॉडी) सभा झाली. ऑल इंडिया कौन्सिल ऑफ टेक्निकल एज्युकेशन (ATCTE) च्या सूचनेनुसार ही सभा वर्षातून तीन वेळा घेणे बंधनकारक व आवश्यक असते. कारण या सभेमधूनच संस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी काही योजना करता येतात व त्यानुसार संस्थेचीही प्रगती होत जाते.

विद्या प्रसारक मंडळाचे सहा सभासद, सहसंचालक तंत्रशिक्षण मंडळाचे प्रतिनिधी, ऑल इंडिया कौन्सिल ऑफ टेक्निकल एज्युकेशन यांचा एक प्रतिनिधी, महाराष्ट्र राज्य बोर्ड ऑफ टेक्निकल एज्युकेशन सेक्रेटरी, परीक्षा नियंत्रक आणि ठाण्याच्या जवळपास असणाऱ्या कारखान्यांचा एक प्रतिनिधी या सर्वांची या समितीत नियुक्ती असते. तंत्रनिकेतनाचे प्राचार्य श्री. मुजूमदार यांनी ही सभा आयोजित केली होती. या सातव्या नियंत्रक समितीच्या सभेला श्री. जी. आर. वारहाते, सहसंचालक तंत्रशिक्षण मंडळ, श्री. एम्. ए. मुळे, परीक्षा नियंत्रक महाराष्ट्र राज्य बोर्ड ऑफ टेक्निकल एज्युकेशन आणि प्रा. सौ. विद्या राजगुरु (कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुणे इलेक्ट्रिकल विभाग) या AICTE च्या प्रतिनिधी व उपप्राचार्य श्री. नायक उपस्थित होते. याशिवाय कारखान्यांच्या वतीने श्री. सी. एस्. लिमये हे प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते.



डावीकडून डॉ. विजय बेडेकर (कार्याध्यक्ष वि. प्र. मं. ठाणे) श्री. बारहाते (सहसंचालक , तंत्रशिक्षण मंडळ), श्री. सी. एस्. लिमये (कारखानदार), प्रा. सौ. विजया राजगुरु (कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुणे)

या सभेचे अध्यक्षपद विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी भूषविले होते.

या सभेत तंत्रनिकेतनाचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी वेगवेगळ्या सूचना करण्यात आल्या. याशिवाय तंत्रनिकेतनातर्फे नवीन अभ्यास क्रम चालू होत आहेत त्यांची माहितीही देण्यात आली. या अभ्यास क्रमात एक वर्षाचा डिप्लोमा कोर्स इन इंडस्ट्रिअल सेफ्टी आणि कॉम्प्युटर हार्डवेअर या दोन विषयांचा समावेश आहे.

तसेच तीन वर्षाच्या पदविका अभ्यासक्रमासाठी इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशन आणि कॉम्प्युटर इंजिनिअरींग हे दोन अभ्यासक्रम चालू केले आहेत. याची ही माहिती या समितीस देण्यात आली.

हा अभ्यासक्रम सुरु केल्याने ठाण्याच्या जवळपास राहण्याचा सर्व विद्यार्थ्यांना याचा चांगला लाभ घेता येईलच. २१ व्या शतकात हे महत्त्वाचे अभ्यासक्रम तंत्रनिकेतनाचे आर्थिक प्रश्न सोडवण्यास ही याचे साह्य होईल अशी खात्री आहे.

## ऑकलंड परिषदेसाठी सौ. विशाखा देशपांडे यांना आमंत्रण

येथील विद्या प्रसारक मंडळाच्या आनंदीबाई जोशी शाळेतील शिक्षिका सौ. विशाखा देशपांडे यांची 'चाईल्ड केअर इन्फर्मेशन एक्सचेंज, अमेरिकाच्या ४ थ्या जागतिक परिषदेसाठी निवड झाली असून भारतातून केवळ दोनच स्त्रिया या परिषदेसाठी गेल्या आहेत. यंदा ही परिषद न्यूझीलंड मधील ऑकलंड येथे भरत असून परिषदेचा विषय 'रोल ऑफ वुमन इन अर्ली चाईल्ड केअर वर्ल्ड 'असा आहे.



सौ. विशाखा देशपांडे

या परिषदेत सौ. विशाखा देशपांडे भारतीय स्त्रियातील वैफल्य भावनेचा अपत्य वाढीवर होणारा परिणाम हा विषय सादर करणार आहेत. यात या वैफल्या ग्रस्तेतून बाहेर येण्याच्या दृष्टीने काही मार्गही त्या सुचवणार आहेत.

या दौऱ्यात ऑकलंड बरोबरच मलेशिया व कोललंपूर या देशांनाही त्या भेट देणार असून तेथील शिक्षकांना नाट्य तंत्राचा शिक्षणात वापर कसा करावा या दृष्टीने त्या मार्गदर्शन करणार आहेत.

## विर्धा महाविद्यालयात वार्षिक सोहळा साजरा

विद्या प्रसारक मंडळाच्या विर्धा महाविद्यालयातील वार्षिक सोहळा कॉलेज कॅम्पसमधील थोरले बाजीराव पेशवे सभागृहात आयोजित करण्यात आला होता.

प्रमुख पाहुण्या म्हणून ख्यातनाम अभिनेत्री स्मिता तळवळकर यांनी हजेरी लावली होती. "सार्वजनिक समारंभामध्ये आपण आवर्जून 'मराठी' मध्ये बोलतो, असे सांगून त्यांनी आपले मायबोलीवरचे प्रेम व्यक्त केल्यानंतर सर्वांनी त्यांचे कौतुक केले. या प्रसंगी आपल्या अभिनय करीयर मधल्या आठवणी देखील तळवलकर यांनी रसिकांना सांगितल्या. एक संवेदनशील मनाच्या कलाकाराने भावी वकीलांशी साधलेला संवाद अविस्मरणीय असाच होता. विद्यार्थ्यांच्या नंबर वन पसंदीच्या प्राध्यापिका आणि आदरस्थान असलेल्या महाविद्यालयाच्या प्राचार्य जान्हवी नवरे, विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर आणि महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक याप्रसंगी उपस्थित होते.

सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये यशवंते आणि राहुल गरुड यांनी म्हटलेल्या 'चोरीचा मामला' या गाण्याने विद्यार्थ्यांचे हृदय चोरून नेले. उदय सोनावणे, रवी, पंकज, संतोष, वैभव यांच्या कोकणी दशावताराने भेट कोकणच्या वैभवशाली सांस्कृतिक परंपरेची सफर घडवली.

कांचन कुलकर्णी आणि माधव यांच्या गाण्यांचा 'कोलाज' विद्यार्थांची विशेष दाद घेऊन गेला. नागेंद्र यांचे 'जाने मन जाने मन' वैभव, हेमांगी, यामिनी, मनोज, पंकज, निलुफा यांचा 'फ्युजन डान्स' या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण होते. राष्ट्रीय प्रेम आणि एकात्मतेची भावना देशातील तरुणांमध्ये ठासून भरलेली असते. प्रगटीकरण अशा समारंभातून झाले नाही तर नवल. संजीवनी, अनिता, रोहिणी, सुनीता, मनोज यांच्या नॅशनल इंटीग्रेशन मार्च' ने याची जाणीव करून दिली. माझी सख्खी बायको मेली' या धमाल विनोदी नाटकात उदय, रवी, राहुल, हेमांगी, कांचन, सुबिनीता आणि मनोज यांचा अभिनयदेखील धमाल होता. एकूणच व्हरायटी एन्टरनमेंटने रंगलेला हा वार्षिक सोहळा सगळ्यांनाच खुश करून गेला. कॉलेजच्या जनरल सेक्रेटरी भक्ती पंड्या तसेच इतर सदस्य कांचन कुलकर्णी, उदय सोनावणे, सुबिनीता, यशवंत, पंकज वांदेकर, रविंद्र केदार, राहुल गरुड, अमित मासेकर, अभिजित गांधी, वैभव भोईर आदींनी सोहळ्यासाठी परिश्रम घेतले.

याप्रसंगी गुणवंत विद्यार्थ्यांचा पारितोषिक देऊन सत्कार करण्यात आला. इजारी अन्नपुर्णा, एम. पी. वाघ, मीरा, माळी रामसीग, ताम्हाणे नमिता, गोखले, धनश्री, अय्यर, कविता, सिद्दीकी, साळवी गायत्री, सिंघ स्मिता, मयुरा कोटस्थाने, कांचन कुलकर्णी, डॉ. संजय देशमुख आदींना विविध विषयांत आणि स्पर्धांमध्ये नैपुण्य मिळविल्याबद्दल पाहुण्यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या 'संयुजा' या वार्षिकाचे अनौपचारिक प्रकाशन गणित विभागाचे प्रमुख व जेष्ठ प्रा. आर. एस्. पोद्दार यांच्या हस्ते अलीकडेच झाले. या प्रसंगी प्रा. डी. सी. पेजावर, प्रा. अशोक पाटील, डॉ. अंबिके, प्रा. स.ग. भेडेकर यांच्यासह संयुजाचे विद्यार्थी प्रतिनिधी, केतन कांबळे व त्याचे सहकारी मित्र उपस्थित होते. संयुजाचे संपादन प्राचार्य सी. जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्याचे प्रा. सौ. सरिता जोगळेकर आणि संयुजा समितीतील त्यांचे सहकारी यांनी केले.

**प्रा. मोहन पाठक**